विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष पहिले ▌अंक दहावा ▌ जुलै २०२३



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे
यांना
विनम्र अभिवादन

जातीय धार्मिक
सलोखा
जोपासायला हवा





ढोंगी
फरीदबाबाचा
भांडाफोड




पन्हाळा (कोल्हापूर) येथे विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक उत्साहात संपन्न

₹ २०/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# विस्तारीत राज्य कार्यकारिणी बैठक : पन्हाळा (कोल्हापूर) : क्षणचित्रे

## मनोगत व्यक्त करताना



डॉ. आ. ह. साळुंखे



किशोर बेडकीहाळ



राज्य अध्यक्ष, भाई अविनाश पाटील



राज्य कार्याध्यक्ष
माधव बावगे



राज्य प्रधानसचिव
संजय बनसोडे



जिल्हा अध्यक्ष
डॉ. बी. एम. हिर्डेकर



राज्य सरचिटणीस
कृष्णात स्वाती



राज्यभरातून उपस्थित असलेले राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव, शाखा कार्याध्यक्ष प्रधान सचिव आणि प्रमुख कार्यकर्ते

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे–पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  ‘कल्पतरू’, कर्मवीर भाऊराव
  पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली–४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  अरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य : ₹ २०/–**
- **पृष्ठ संख्या : ४०**

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष पहिले । अंक दहावा**

**जुलै २०२३**

## अनुक्रमणिका

- **संपादकीय** ४
- **अभिवादन**
  लोकशाहीर अण्णाभाऊ साठे/किशोर बेडकिहाळ ५
  अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक व राजकीय विचार/ डॉ. विजय राऊत ९
- **प्रासंगिक**
  परिवर्तनाचे शास्त्र आणि कला/डॉ. आ. ह. साळुंखे ११
  जातीय-धार्मिक सलोखा जोपासायला हवा! / यशवंती शिंदे १४
  छत्रपती शिवाजी महाराज / रुपेश शोभा १७
- **विज्ञान विश्व**
  विचार तर कराल ? / जगदीश काबरे १८
- **बुवाबाजी**
  ढोंगी फरीदबाबाचा भांडाफोड / नरेश आंबिलकर २०
- **जडण-घडण**
  ...आणि अंनिसमुळे विवेकी झालो / निशांत सुनंदा विश्वास २२
- **अहवाल**
  कार्यकर्त्यांना उर्जा देणारी राज्य बैठक / संजय बनसोडे/डॉ.टी.आर. गोराणे २४
  पुस्तक प्रकाशन आणि लक्ष्यवेधी पुरस्कार समारंभ / प्रल्हाद मिस्त्री ३०
- **लक्षवेधी पुरस्कार-२०२३** ३१
- **वाचन प्रतिक्रिया** ३३
- **महा. अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३४
- **गणितप्रेमी** / सुरज उर्मिला सुनील ३७
- **शब्दकोडे**/ उत्तम जोगदंड ३८

‘अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका’ हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर–४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली–४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## ।। सं पा द की य ।।

### जग बदल घालूनी घाव

अतिशय कमी कालावधीत अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका (अंनिप) अंक महाराष्ट्राच्या विचारविश्वात आपला वैचारिक दबदबा आणि प्रभाव निर्माण करीत आहेत. अंनिप दिवसेंदिवस आपला दर्जा उंचावून ताठ मानेने महाराष्ट्रातील जनतेच्या मनात अधिराज्य गाजवत आहे, याचा आम्हास रास्त अभिमान आहे. जुलै महिन्यात माणसाचे अवमूल्यन करणाऱ्या वर्णव्यवस्थेच्या, जातीव्यवस्थेच्या छाताडावर नाचणारे, माणसासाठी माणुसकीचे गीत गाणारे थोर साहित्यिक बाबुराव बागुल आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे आपण स्मरण करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशात १९५६ ला एका नव्या सांस्कृतिक क्रांतीचा आरंभ केला. ही क्रांती यशस्वी करण्यात लेखक, साहित्यिक महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतील हा त्यांना विश्वास होता. म्हणून बाबासाहेबांनी आपली साहित्यविषयक भूमिका विशद केली आहे. साहित्य आणि समाज, साहित्य आणि सामाजिक बांधिलकी, साहित्य आणि जीवनमूल्ये यांतील सेतुबंध स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणतात,

''आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्य धर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होऊन विचार केला तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचे भेसूर चित्र उभे राहील. कारणे काहीही असोत पण आपण अधःपतनाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत असेच आढळून येईल. तेव्हा तत्परतेने सावध होऊन जीवनविषयक व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यिकांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनविली पाहिजेत, वृद्धिंगत केली पाहिजेत.'' या शब्दात त्यांनी झपाट्याने होत असलेल्या मूल्यऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर साहित्याची जीवननिष्ठा प्रतिपादित केली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेची आजपर्यंतची वैचारिक वाटचाल पाहता अंनिप बाबासाहेबांनी दाखवलेल्या बोटांच्या दिशेनेच जात आहे, हे मान्यच करावे लागेल. या वैचारिक प्रवासाचा आम्हास सार्थ गौरव वाटतो. अंनिपच्या माणूस भयमुक्त, समतायुक्त आणि शोषणमुक्त करणाऱ्या सर्व उपक्रमांना उदंड यश येवो, ही मंगलकामना. याही अंकाचे वाचक मनःपूर्वक स्वागत करतील, अशी आशा आहे.

**प्रा. डॉ. सुशील मेश्राम**
अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.




# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

**किशोर बेडकिहाळ,** सातारा
९४२३०१२८७७

थोर मराठी साहित्यिक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जन्मशताब्दी नुकतीच संपली. मराठी मातीचा अस्सल गंध ज्यांच्या साहित्यातून दरवळतो असे साहित्यिक म्हणजे अण्णाभाऊ साठे होत. ते नुसतेच साहित्यिक नव्हते, तर लोकशाहीर आणि कार्यकर्तेही होते. अण्णा भाऊंच्या साहित्यातून उपेक्षित, अन्यायग्रस्त शोषित, पीडित, असन्मानित  अशा कष्टकरी, दलित स्त्री–पुरुषांचे दर्शन घडते. मराठी समाजमनाला श्रमिक वर्गाच्या प्रश्नांचे भान अण्णाभाऊंच्या साहित्याने दिले. परंपरागत दारिद्र्य, ज्ञानपरंपरेने दिलेली वंचितता, कोणत्याही वजनदार घराण्याची पुण्याई मागे नाही, फक्त कष्ट आणि कष्ट हाच जगण्याचा आधार असणाऱ्या असंख्य कुटुंबांपैकी एका कुटुंबात जन्मलेले अण्णाभाऊ साठे, पोट भरण्यासाठी आपल्या कुटुंबियांबरोबर २२७ मैल पायी चालून मुंबईला गेले. मुंबईत गेले ते थेट माटुंगा लेबर कॅम्पमध्ये. गिरणी कामगारांच्या विश्वात ते सामावले गेले.

तोडकेमोडके वाचन व फक्त लिहायला येणे ही कला व अपरिमित कष्टाची तयारी या भांडवलावर अण्णा भाऊंनी स्वतःचे कर्तृत्व घडविले. पंधरा पोवाडे, लावण्या, एक नाटक, दहा लोकनाट्य, एक प्रवासवर्णन, तेवीस कथा, पाच कादंबऱ्या एवढ्या साहित्याचा ऐवज अण्णाभाऊंनी आपल्यामागे ठेवला आहे. अगदी अलीकडे ‘युगांतर’ मासिकातल्या त्यांच्या अप्रसिद्ध कविता, कथा आणि भाषणांचे संपादन झाले आहे. त्यांच्या साहित्यावर सात चित्रपट निघाले, त्यापैकी तीन चित्रपटांना राज्यपुरस्कार मिळाले. ‘लोकशाहीर’ ही अण्णाभाऊंची विशेष ओळख. संयुक्त महाराष्ट्राच्या काळात शाहीर गवाणकर, शाहीर अमर शेख व शाहीर अण्णाभाऊ साठे या तीन शाहिरांनी महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला व महाराष्ट्राच्या महामंथनात आपले योगदान दिले. ‘स्टॅलिनग्राडचा पोवाडा’, ‘माझी मैना गावावर राहिली’, ‘मुंबईची लावणी’, ‘जग बदल घालूनी घाव’ आणि ‘महाराष्ट्रावरचा पोवाडा’ हे त्यांचे पोवाडे आणि लावणी विशेष गाजले. अण्णा भाऊ गिरणी कामगार चळवळीच्या विश्वात रमले व वाढले आणि राजकीय विचारप्रणाली म्हणून त्यांनी साम्यवादाचा स्वीकार केला. सोविएत रशियाचा दौराही त्यांनी केला.



स्टॅलिनग्राडचा पोवाडा त्यांनी रशिया पाहाण्याआधीच लिहिला होता. क्रांतीनंतर तर रशिया त्यांना श्रमिकांचा स्वर्ग वाटला. समाजवादी क्रांतीमुळे सामान्य रशियन नागरिक दुसऱ्या महायुद्धात व त्यातही स्टॅलिनग्राडच्या युद्धात  ईर्षेने लढले व त्यांनी हिटलरचा पाडाव केला असे अण्णा भाऊंना वाटे. त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान, श्रमिकांबद्दलची आस्था व रशियन सैन्याचा पराक्रम या तिन्हींचे दर्शन त्यांच्या ‘स्टॅलिनग्राडचा पोवाडा’ मध्ये आपल्याला घडते. हा पोवाडा समजून घेण्यासाठी आपणाला स्टॅलिनग्राडची लढाई थोडक्यात समजून

घ्यावी लागेल.

स्टॅलिनग्राडची लढाई ही दुसऱ्या महायुद्धाचे पारडे निर्णायकरित्या मित्रराष्ट्रांच्या बाजूने फिरवणारी लढाई मानली जाते. जवळजवळ युरोप पादाक्रांत करणाऱ्या हिटलर व त्याच्या फौजांना रशियात लगाम घातला गेला. दुसरे महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले. १९४१ पर्यंत सोविएत रशिया या युद्धात नव्हता. रशिया आणि जर्मनीच्या सैन्याचा अनाक्रमणाचा करार झालेला होता. युरोपातील फ्रान्स आणि जवळजवळ अनेक राष्ट्रे जिंकल्यानंतर हिटलरच्या पाशवी आणि सैतानी महत्त्वाकांक्षेला आणखीन पंख फुटले व १९४१ साली त्याने अनाक्रमणाचा करार मोडून रशियावर हल्ला केला. स्टॅलिनग्राड हे शहर तत्कालीन सोविएत नेता व रशियाचा सर्वेसर्वा कॉम्रेड जोसेफ स्टॅलिन याच्या नावे वसले होते. व्होल्गा नदीच्या तीरावर वसलेले शहर त्यावेळेला सोविएत रशियातील मोठे औद्योगिक केंद्र होते. मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर व शस्त्रास्त्रे यांची निर्मिती या शहरात होत होती. हे शहर ताब्यात आले, तर सोविएत रशियाची युद्धातील रसद पुरवण्याची साखळी तर तुटेलच; पण त्याचबरोबर मॉस्कोकडे जाण्याचा तसेच दक्षिणेकडे कोकेशस पर्वत जिंकण्याचा मार्गही मोकळा होईल, असा हिटलरचा अंदाज होता. त्या भागातील आर्थिक साधनांवरही ताबा मिळवता येईल व जर्मन सैन्याला रसद पुरवठा सातत्याने चालू ठेवता येईल, हा दुसरा हेतू होता. १७ जुलै १९४२ ते २ फेब्रुवारी १९४३ हा स्टॅलिनग्राडच्या लढाईचा काळ. पण हे आठ महिने रशियाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. शिवाय स्टॅलिनग्राड शहर स्टॅलिनच्या नावे ओळखले जात होते. ते जर ताब्यात आले, तर स्टॅलिनच्या नावाची मानहानी होईल, तसेच रशियन सैनिकांचे मनोधैर्य खच्ची होईल, हाही उद्देश त्यात होता. इतिहासात जर–तरच्या प्रश्नांनी इतिहासाला कलाटणी मिळते. अशा जर–तरच्या प्रश्नांची स्टॅलिनग्राडची लढाई होय. जर खरेच हिटलर जिंकला असता, तर काय हा प्रश्न मनाला आजही हादरवून टाकतो.

स्टॅलिनग्राडच्या लढाईत हिटलर सातत्याने वेगवेगळे आदेश देत होता. आपले आधीचे आदेश बदलत होता. ९ जुलै १९४२ ला हिटलरने स्टॅलिनग्राड व कॉकेशसचा भाग एकाच वेळी ताब्यात घेण्याचे नियोजन करून तसा आदेश दिला व सैन्याची विभागणी त्याप्रमाणे केली. त्याआधी ५ एप्रिल १९४२च्या आदेशान्वये दक्षिणेकडील कॉकेशसचा भाग ताब्यात घेण्याच्या दृष्टीने त्याने आदेश दिला होता. आधीचा सेनापती फिल्ड मार्शल फेडर वॉन बॉक याला बदलले व फील्ड मार्शल विल्हेल्म लिस्ट या दोघांत त्याने सेनेची विभागणी केली. स्टॅलिनग्राड व कॉकेशस पर्वत एकाच वेळी ताब्यात घेण्याची महत्त्वाकांक्षी मोहीम आखली गेली. त्यामुळे जर्मन सैन्याच्या रसद पुरवठ्यावर ताण निर्माण झाला. ऑगस्ट १९४२ मध्ये हिटलरने पुन्हा सैन्याला दक्षिणेकडून व उत्तरेकडून अशा दोन्ही बाजूने स्टॅलिनग्राडवर हल्ला करण्याचा व घेरण्याचा आदेश दिला. हिटलरचा या मोहिमेत वारंवार हस्तक्षेप चालू होता. त्यामुळे सेना प्रमुखांना निर्णय घेणे कठीण जात होते. तसेच रसद पुरवण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत होता. फेड्रिक पॉल्स या सेनाधिकाऱ्याला लढाई अंतिमरीत्या व निर्णायकरित्या जिंकण्यासाठी हिटलरने प्रोत्साहन दिले. त्याला फिल्ड मार्शलची पदवीही बहाल केली. पण नेमकी याच ठिकाणी पॉल्सला रशियाच्या तीव्र प्रतिकाराला सामोरे जावे लागले. स्टॅलिनग्राड शहरावर प्रचंड बॉम्बहल्ले झाले. ४० हजार नागरिक मारले गेले. इमारती उद्ध्वस्त झाल्या पण या शहराने ही लढाई लढली आणि ही लढाई लढणाऱ्या सीमोन तीमोशेनको या सेनाधिकाऱ्याने धीर सोडला नाही व प्रतिकार मात्र तीव्र केला.

बदलत्या हवामानाचे, थंडीचे झालेले आगमन सोविएत सैन्याच्या पथ्यावर पडले. या थंडीत व्होल्गा नदीचे बर्फात रूपांतर झाले होते. जर्मन सैन्याच्या रसद पुरवठा करण्यावर परिणाम होत होता. हिटलरने जसे पॉल्सला माघार न घेण्याचा व पुढे जाण्याचा आदेश दिला; तसाच माघार न घेण्याचा आदेश स्टॅलिननेही सीमोन तीमोशेनकोला दिलेला होता.

१४ ऑक्टोबर १९४२ हा स्टॅलिनग्राड लढाईचा निर्णायक क्षण. तिथपासून पुढे सोविएत सैन्याची सरशी होत गेली. अंतिमतः हिटलरच्या सैन्याचा पराभव झाला. स्टॅलिनने शहर न सोडण्याच्या दिलेल्या आदेशाचे मर्म महत्त्वाचे आहे. अण्णाभाऊंच्या पोवाड्यातही त्याचा उल्लेख आहे. लहान मुले, नागरिक, जवान असे सर्वजण

शहरात राहातात. त्यामुळे आपल्या नागरिकांच्या जीविताचे रक्षण प्राणपणाने करण्याची प्रेरणा सैन्याला मिळेल व त्या इरेने, इर्षेने सैन्य लढाईत सहभागी होईल. शहर खाली केले असते, तर फक्त पराभव समोर होता. मग सैनिकांचे मनोधैर्यही खचले असते. ते होऊ द्यायचे नाही ही स्टॅलिनची त्यावेळची युद्धनिती होती आणि ती अचूक ठरली. प्रतिकूल हवामान व चिवट प्रतिकार यासमोर हिटलरचा आदेश डावलून जर्मन सेनापती पॉल्सने शरणागती स्वीकारली. २ फेब्रुवारी १९४३ रोजी तो शरण आला. पॉल्ससोबत २२ जनरलही शरण आले. अडीच लाख जर्मन आणि रोमानियन सैनिक पकडले गेले. हिटलरच्या आघाडी राष्ट्रांचे सुमारे आठ लाख एवढे सैन्य जखमी तरी झाले, मारले गेले, परागंदा झाले किंवा पकडले गेले. ९१ हजार सैनिक शरणागतीच्या वेळेला शरण गेले, त्यांच्यापैकी फार तर पाच ते सहा हजार लोक १९५५ पर्यंत आपापल्या मायभूमीला परत जाऊ शकले. उर्वरित सैनिक सोविएत तुरुंगात किंवा श्रम छावण्यांमध्ये मारले गेले. प्रचंड जीवित व वित्तहानीची किंमत मोजून स्टॅलिनग्राडची लढाई सोविएत रशियाने जिंकली. १९४५ मध्ये स्टॅलिनग्राडला हीरो सिटीचा दर्जा मिळाला. रशियाचा, तो अभिमान बिंदू म्हणून जाहीर झाला. तेच स्टॅलिनग्राड आता व्होल्गोग्रॅड म्हणून ओळखले जाते. कारण ते व्होल्गा नदीच्या तीरावर आहे. अमानुष नरसंहार घडलेल्या या लढाईवर अण्णा भाऊ साठे पोवाडा लिहितात, ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.

अण्णाभाऊंच्या पोवाड्याची नावे पाहिली तरी ती व्यक्तीवाचक नाहीत. ती प्रदेशवाचक किंवा प्रश्नवाचक आहेत, प्रश्नांना सामोरे जाणारी आहेत, हे त्यांचे वैशिष्ट्य. हे कशातून आले, तर अण्णा भाऊंच्या साम्यवादी जीवनदृष्टीतून. अण्णा भाऊ साम्यवादी असल्याने सोविएत क्रांती हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानात श्रमिकवर्गीय क्रांतीचे महत्त्व अपरंपार.

सोविएत रशियात कॉम्रेड लेनिनच्या नेतृत्वाखाली मार्क्सवादी कार्यकर्त्यांनी क्रांती घडवून आणली व झारची हुकूमशाही सत्ता उलथवून टाकली, जी राजेशाहीची अखेर ठरली गेली. लेनिनच्या नेतृत्वाखालील कामगार वर्गाची एकाधिकार सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली निर्माण झाली. या नव्या शक्तीने खाजगी मालकी व शोषणाचे उच्चाटन केले. उत्पादन साधने राष्ट्राच्या मालकीची झाली व अल्पावधीतच वैज्ञानिक, लष्करी असा भक्कम पाया असणारे एक प्रबळ औद्योगिक राष्ट्र म्हणून रशिया उभा राहिला. अण्णाभाऊंना रशियाच्या प्रगतीचे खूप कौतुक होते. 'माझा रशियाचा प्रवास' या त्यांच्या प्रवासवर्णनात याची पुरेपूर प्रचिती येते. स्टॅलिनग्राडच्या लढाईचे त्यांच्या पोवाड्यात नुसतेच वर्णन नाही, तर त्या लढाईतील बारकावेही त्यांनी टिपले आहेत. स्टॅलिनच्या तिमोशेंकोला दिलेल्या आदेशाची प्रेरणा अण्णा भाऊंनी नेमकी हेरलेली आहे. सोविएत सैन्याची ईर्षा त्यांनी प्रभावीपणे पोवाड्यात चित्रित केली आहे. विशेष म्हणजे हा पोवाडा इतका लोकप्रिय झाला की, अण्णाभाऊ रशियाला जाण्यापूर्वीच तो पोवाडा तिथे पोहोचला होता. जवाहरलाल नेहरू, राजकपूर हे रशियात लोकप्रिय होतेच; पण हा पोवाडाही कमी लोकप्रिय नव्हता. लोकशाहीर अण्णाभाऊंचा हा पोवाडा ५९ चौकांत लिहिला आहे. चौक शब्द कडव्याला पर्याय असावा. एकाच कडव्यात किंवा चौकात निरनिराळ्या चाली आहेत. पोवाड्याची रचना सादरीकरणाच्या दृष्टीने केलेली आहे. पोवाड्याची सुरुवात आणि शेवट 'दलितांचा आशाकिरण, रशियाचा प्राण' असा अण्णाभाऊंनी केला आहे व त्यात रशियन योद्धांची नावे त्यांनी घातली आहेत. दलितांचा आशाकिरण ही अण्णा भाऊंची तळमळ व श्रद्धा आहे. जीवननिष्ठा आहे. योद्धांची नावे हा अभिमान व कृतज्ञभावातून आली आहेत. या पोवाड्यात काय काय वर्णिलेले आहे हे पाहिले की, अवाक् व्हायला होते. दुसरे महायुद्ध सुरू होताच पहिल्या दणक्यात युरोपातल्या अनेक राष्ट्रांनी हिटलर समोर नांगी टाकली. फ्रान्स, रोमानिया, बल्गेरिया, सर्बिया, झेकोस्लोवाकिया, नॉर्वे, डेन्मार्क अशी यादी त्यांनी पोवाड्यात दिली आहे. फ्रान्सच्या पुढाऱ्यांनी केलेल्या विश्वासघाताचा उल्लेख ते आवर्जून करतात. भांडवलदारांना कम्युनिस्टांची भीती वाटत होती म्हणून 'त्यांचे हस्तक नाझींना फितूर झाले व शरण गेले', अशी मीमांसाही त्यांनी मांडली आहे. नाझींनी कम्युनिस्टांची मान मुरगळली याचा उल्लेख अण्णाभाऊंनी केला आहे. फ्रान्सच्या माघारीचा, नाझींना न अडवण्याचा

हुकूम दिला नाही, म्हणून फ्रान्सच्या सत्ताधाऱ्यांची निर्लज्ज म्हणून अण्णाभाऊंनी संभावना केली आहे.

युरोपचा बराच भाग गिळंकृत केल्यावर हिटलरने हेस या अधिकाऱ्याला ब्रिटनमध्ये जाऊन आम्ही जिंकलेल्या युरोपवर आमच्या मालकीला मान्यता द्या, आम्ही युद्ध थांबवतो, असा निरोप देण्यास सांगितले. इंग्लंडला गेल्यावर हेसचे काय हाल केले गेले, याचेही अण्णाभाऊंनी आपल्या पोवाड्यात वर्णन केले आहे. त्या निरोपातच कम्युनिस्ट रशियावर हल्ला करून त्याला संपवतो व ते भूत गाडून टाकतो, असाही निरोप होता. यातून नाझीवादाची मूळ प्रेरणाच अण्णाभाऊंनी व्यक्त केली आहे. हेसची इंग्लंडमध्ये झालेली फजिती सांगून अण्णाभाऊ त्यातून सोविएत लोकशाही मोडून आशिया ताब्यात घेण्याचा हिटलरचा उद्देशही स्पष्ट करतात. याचा परिणाम होऊन रशिया कसा जागा झाला, हे अण्णाभाऊ आपल्याला सांगतात. लेनिन आणि स्टॅलिनचा रशिया हा सोशालिस्ट कोंदणातील रशिया आहे, हे सांगून अण्णाभाऊ म्हणतात की, त्यामुळेच नाझीला फितूर न होता हा रशिया नाझीला आडवा गेला. समाजवादी रशियाबद्दलची आपली प्रतिमा, चष्मे बदलावेत, असा याचा एक अर्थ होतो. ‘जोवर शत्रू रशियात, तोवरी शस्त्र हातात, घेऊनी लढू अविश्रांत, गनिमांचा करू निःपात’, ही रशियन सैनिकांची ईर्षा अण्णा भाऊंनी व्यक्त केली आहे. युद्धातले स्टॅलिनचे आवाहन हे राष्ट्रवादी होते. म्हणूनच ‘अखेरची गोळीक मरेला, तेच मारील गनिमाला, वाचवा माय देशाला’, हे अण्णाभाऊ साठे यांनी वरील शब्दात व्यक्त केले आहे. याच पोवाड्यात नाझी सैन्याने निरपराध नागरिक, युवा, बालके यांच्या केलेल्या हत्या, त्यांची अमानुषता, भयावहता याला प्रत्युत्तर देताना प्रत्येकाचे रशियन सैनिकात कसे रूपांतर झाले, अबला वाटणाऱ्या स्त्रियांनी कसा करारी प्रतिकार केला, याचा उल्लेखही अण्णाभाऊंनी केले आहे. लढाई चालू असताना निराशेचे क्षणही अण्णा भाऊंनी अचूक टिपले आहेत. तीमोशनकोव इतर योद्धांची नावे अण्णाभाऊंनी पोवाड्यात घेतली आहेत. व्होल्गाचे गोठणे, थंडीचे आगमन, दोन्ही सैन्यांची बदलती युद्धनीती, लढाईतील अखेरचा टोला, पॉल्सची माघार, नाझीचा उतरलेला नक्षा आणि हिटलरच्या आदेशाची पॉल्सने केलेली उपेक्षा, पॉल्सला रशियन सेनेने दिलेला निर्वाणीचा इशारा या साऱ्यांचे तारखांसहित वर्णन अण्णा भाऊंनी पोवाड्यात केले आहे.

अवघ्या सहा आठवड्यात रशिया सर करू व नाझीचे अजिंक्यपद सिद्ध करू हे हिटलरचे स्वप्न सोविएत सैन्यांनी उधळले याचा आनंद व्यक्त करून अण्णाभाऊ हसत हसत मृत्यूला कवटाळून स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या शूर रशियन जवानांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करतात. अण्णाभाऊंची या पोवाड्यातील भाषाशैली रोखठोक आणि मराठमोळी आहे. फारशा काल्पनिक उपमांना काही अपवाद वगळता त्यात स्थान नाही. ‘पसरला बर्फ चोहीकडे गारीगार, त्याने अच्छादिले संगर, झाले शुभ्र’. व्होल्गाचे बर्फ झाल्यानंतरची लढाई कशी झाली, याचे वर्णन त्यांनी केलेले आहे किंवा ‘फॅसिस्ट ढग वितळला, स्टॅलिनग्राड तो चंद्र मोकळा झाला’ किंवा ‘बर्लिनचा आरिव्ह गेला’, असा हिटलरचा त्यांनी उल्लेख केला आहे. या ओळी त्यांच्या पोवाड्यातल्याच आहेत. बाकी पोवाडा हा साधा, रोखठोक भाषेने भरलेला आणि भारलेला आहे.

स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या शूर रशियन जवानांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. स्टॅलिनग्राडची लढाई केवळ सैनिकांची नव्हती. ती राष्ट्रवाद व स्वातंत्र्य यांनी भारलेल्या जनतेची झाली व त्यातूनच जग जागं झालं असं पोवाड्याची सांगता करताना ते म्हणतात. स्टॅलिनग्राडची लढाई ही उर्वरित जगाच्या स्वातंत्र्याची चाहूल होती, दोस्त राष्ट्रांची उमेद वाढवणारी होती, हिटलर पराभूत होऊ शकतो, ही दाखवणारी होती आणि मुख्य म्हणजे अण्णाभाऊंच्या श्रमिक राज्याच्या वैश्विक स्वप्नाच्या विजयाची होती. त्या विजयाचा हा पोवाडा लिहून अण्णाभाऊंनी मराठी पोवाडा वाङ्मयात मोलाची भर घातली आहे, हेच खरे.

(लेखक ज्येष्ठ विचारवंत आणि अंनिपचे सल्लागार मंडळ सदस्य आहेत.)

●




# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक व राजकीय विचार

**डॉ. विजय राऊत,** नागपूर
९८५०२३६८७१

मराठी साहित्यात उपेक्षित, वंचित, स्त्रियांच्या वेदनांना साहित्यातून दमदारपणे प्रकट करणारे अण्णाभाऊ साठे हे उपजत सिद्धहस्त लेखक होते. शिक्षणाचा फारसा परिचय नसणारा हा कामगार माणूस साहित्यरत्न म्हणून ओळखला जावा, हे घटित निश्चितच अखिल मराठी जनांसाठी अभिनव आणि तितकीच प्रेरणादायी बाब आहे. आपला भवताल तीक्ष्ण साहित्यिक मन:चक्षूने टिपणे आणि त्याला शब्दरूप देणे अण्णाभाऊंना लीलया जमले. त्यासाठी त्यांना कोण्या अलौकिक शक्तीची आराधना वगैरे करायची, सुदैवाने गरज पडली नाही. ना ते कोणत्यातरी बायीन वातावरणात जन्माला आले. पण तरीही अस्सल मातीशी नाळ असलेले आणि तितकेच जिवंतपणा अनुभवास देणारे त्यांचे साहित्य मराठी साहित्यातील 'अक्षरवाय' ठरावे, ही त्यांच्या जाणिवेतील संवेदनशीलतेची प्रगल्भता दर्शविणारी आहे. श्रेष्ठ साहित्यिक हा कितीही शिकलेला, कोणत्याही जाती-धर्माचा, कोणत्याही देशाचा, प्रांताचा स्त्री अथवा पुरुष असा कुणीही असू शकतो, अट फक्त तो आपल्या मातीशी जुळलेला, वास्तववादी, प्रगल्भ जाणिवेचा, सूक्ष्म निरीक्षणशक्ती या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असावा. ही सर्व वैशिष्ट्ये अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वात अनुस्यूत होती म्हणून अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ लेखक ठरतात.

१९४० नंतर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यलेखन प्रकाशात आले. सुरुवातीला त्यांनी लावण्या, पोवाडे, कष्टगीत, कथालेखन केले. मुंबई येथे कसबी कामगार म्हणून काम करीत असताना त्यांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. साहाजिकच कम्युनिस्ट वातावरणाच्या प्रभावामुळे त्यांचे हे लेखन कामगारवर्गाला केंद्रस्थानी ठेवून झालेले आहे. पण जसजशी त्यांची सामाजिक जाणीव विस्तारत गेली तसतशी त्यांच्या लेखनाची व्याप्तीही अधिक विविधांगी होऊ लागली. त्यांची लेखणी मग दलित वंचितांचा आवाज झाली, त्यांची कथा अबला स्त्रियांच्या वेदनांना वाचा फोडणारे व्यासपीठ झाले. कादंबरी राष्ट्रीय भावनेने ओसंडून भरलेला समुद्र झाली. इतकेच नाही, तर लावण्या आणि पोवाड्यातून त्यांनी तळागाळातील सामान्य माणसाच्या दबलेल्या आवाजाला वाचा फोडली. तसेच नाटकातून दांभिक समाजाच्या वृत्तीचा पट लोकांसमोर धीटपणे मांडायलाही ते विसरले नाहीत. मूल्यात्मक आणि वास्तववादी विचारधारा सांभाळून विविधांगी साहित्यलेखन करणे हे आव्हान अण्णाभाऊंनी सहज पेललेले आहे. त्यांची 'मुंबईची लावणी' कामगारांच्या श्रमाचे भान सांभाळणारी आहे. 'मुंबईचा गिरणी कामगार', 'अमळनेरचे हुतात्मे', 'छकडा', 'लवादाचा ऐका परकार' इत्यादी रचना साम्यवादी जाणिवेतून निर्माण झालेल्या आहेत. कामगारांचे बेहाल जीवन अण्णाभाऊंच्या रचनांमधून स्पष्ट करतात.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखनप्रपंचात कादंबरी हा वाक्यप्रकारही अधिक सशक्तपणे हाताळलेला दिसतो. त्यांनी एकूण ३० कादंबऱ्यांची निर्मिती केली. त्यात स्वातंत्र्यसंग्राम, पराक्रम, स्त्रियांचे प्रश्न, ग्रामीण



जीवन, प्रेमविषयक विषयांनी भरलेल्या आहेत. 'वारणेच्या खोऱ्यात' या कादंबरीत १९४२ च्या 'चले जाव' चळवळीचे आणि स्वातंत्र्यवीरांचे केलेले जाज्वल्यपूर्ण वर्णन अतिशय हृदयद्रावक पद्धतीने अण्णाभाऊंनी केलेले आहे. 'फकिरा' ही दलित जीवनाची शोकांतिका स्पष्ट करणारी मराठी साहित्यातील सर्वोत्तम कादंबरी ठरते. 'वारणेचा वाघ', 'अग्निदिव्य' या कादंबऱ्यांतून शूर, मराठी स्वातंत्र्यसैनिक आणि मराठा सेनापती प्रतापराव गुजर यांच्या लढवय्या बाण्याची कथा मराठी मातीचा वारसा सांगणारी आहे. 'चित्रा', 'वैजयंता', 'चंदन', 'रत्ना', 'फुलपाखरू', 'चिखलातील कमळ', 'टिळा लाविते मी रक्ताचा', 'आवडी' इत्यादी कादंबऱ्यांतून अण्णाभाऊंनी स्त्रियांच्या शोषणाचा, अन्यायाचा पट साकारलेला आहे. त्यावेळच्या समाजात स्त्रियांची स्थिती समजून घ्यायला या कादंबऱ्या पुरेशा ठरतात. अतिशय कलात्मक आणि तितक्याच वास्तवदर्शी आणि मन विपन्न करणाऱ्या या कादंबऱ्या अण्णाभाऊंनी सामाजिक जाणिवेचा परिचय करून देणाऱ्या आहेत. सहजच त्यावेळच्या काळाचे पडसाद या साहित्यात नैसर्गिकपणे उमटतात. मग ते दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी घेऊन अवतरतात, तर कधी वैजयंता आणि चंदन या स्त्रीपात्राच्या माध्यमातून समाजाचा स्त्रीविषयक किडका दृष्टिकोनही स्पष्ट करतात. प्रणयप्रधान कादंबऱ्याही त्यांनी सहज हाताळलेल्या दिसतात. 'अलगूज', 'आघात', 'गुलाम', 'अहंकार' इ. कादंबऱ्यांतून ग्रामीण प्रेमभावनेचे निखळ आणि तितकेच प्रखर दर्शन घडते.

ग्रामीण जनजीवन हा अण्णाभाऊंच्या जिव्हाळ्याचा विषय. ग्रामीण वातावरणात जन्म झाल्यामुळे अस्सल ग्रामीण साहित्य ते निर्माण करू शकले. हे सर्व त्यांनी जवळून बघितले आहे, सोसले आहे त्यामुळेच 'माकडीचा माळ', 'र', 'रानबोका', 'कुरूप', 'पाझर' यांसारख्या ग्रामीण जीवनातील सूक्ष्मातिसूक्ष्म छटा रेखाटणाऱ्या त्यामुळेच अकृत्रिम अशा कादंबऱ्या ते निर्माण करू शकले.

लोकनाट्य, लावणी गीतांच्या माध्यमातून अण्णा भाऊंचे राजकीय विचार स्पष्ट होतात. 'निवडणुकीत घोटाळे', 'शेठजीचं इलेक्शन', 'बेकायदेशीर', 'माझी मुंबई', 'मिरवणूक', 'पुढारी मिळाला', 'लोकमंत्र्यांचा दौरा', 'देशभक्त घोटाळा' इ. कलाकृतीतून त्यांनी तत्कालीन राजकीय स्थितीगतीचा वास्तव पट मांडलेला आहे. राजकारणातील गढूळपणा नेमकेपणाने मांडण्यात अण्णाभाऊंची प्रतिभा विविधांगाने प्रस्फुरित झालेली दिसते. अनेक वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असे हे अण्णाभाऊंचे साहित्य तत्कालीन काळाच्या विविधांगी घटकाचा वेध घेणारे साहित्य आहे. अत्यंत सामान्य, गरीब, कष्टकरी घटक प्रामुख्याने त्यांच्या कादंबऱ्यांचे विषय होतात. अनेक ग्रामीण संदर्भ त्यांच्या साहित्याला अलंकृत करणारे ठरतात. अण्णा भाऊंच्या म्हणण्याप्रमाणेच त्यांचे साहित्य मातीशी नाते सांगणारे आहे. त्यांच्या साहित्यातील ग्रामजीवनदर्शन अस्सल स्वानुभवावर बेतलेले आहे म्हणूनच त्यांच्या साहित्यातील वास्तवदर्शी मूल्ये अधिक परिणामकारक ठरतात.

अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक व राजकीय विचार त्याच्या साहित्यकृतीतून आपसूक प्रकट होतात. त्यासाठी त्यांना वेगळ्या व्यासपीठाची गरज भासली नाही. आपल्या साहित्यकृतीच्या प्रस्तावनेत व मनोगतात प्रसंगोपात त्यांनी ते स्पष्टपणे मांडले आहे आणि जे मांडले नाही ते त्यांच्या साहित्यातून वाचकास सहज आकलन होते. क्लिष्ट वाङ्मयीन संज्ञा न वापरता साध्या सोप्या मराठी भाषेतून त्यांनी परिणामकारकपणे आपले विचार, विविध साहित्यप्रकारातून प्रकट केले आहे. काळाला कवेत घेऊन मार्गक्रमण करणारे अण्णा भाऊ साठे हे साम्यवादी, मानवतावादी चळवळीचे अग्रणी सुधारक होते हे त्यांच्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध होते. अण्णा भाऊ साठे यांचा मूळ पिंड शाहिरीचा होता. शाहीर ज्याप्रमाणे आपल्या कवनातून सतत लोकप्रबोधन करीत असतो त्याप्रमाणे अण्णा भाऊंनी कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक साहित्यप्रकारातून निरंतर लोकजागृती, लोकशिक्षण साकारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो. जग बदलण्याची प्रचंड जिज्ञासा बाळगणारा अण्णा भाऊ साठे नावाचा साहित्यरत्न मराठी साहित्यविश्वात निश्चित शोभून दिसतो.

(लेखक श्री पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड येथे सहयोगी प्राध्यापक)

•

# परिवर्तनाचे शास्त्र आणि कला



**डॉ. आ. ह. साळुंखे,** सातारा

(दि. २ ते ४ जून २०२३ दरम्यान झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत पुस्तक प्रकाशन आणि लक्षवेधी पुरस्कार सोहळा संपन्न झाला. प्राच्यविद्या पंडित, विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी कार्यकर्त्यांना केलेले मार्गदर्शन शब्दबद्ध केले.)

मंचावरील सर्व मान्यवर आणि माझ्यासमोर उपस्थित असलेले महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून आलेले सर्व मान्यवर बंधूभगिनी, मी प्रथम आज ज्या ज्या लेखकांची पुस्तके प्रकाशित झाली, त्या सर्वांचं मनापासून अभिनंदन करतो. अतिशय महत्त्वाच्या विषयांवरती ही सर्व पुस्तके आहेत. तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात अतिशय मोठं योगदान असलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. त्या सर्वांचं मी मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. माझ्या दृष्टीने आनंदाची गोष्ट अशी की, पूर्वेकडील गडचिरोलीपासून तर पश्चिमेकडील नंदुरबारपर्यंत, पश्चिम महाराष्ट्रातील कोकणापासून मराठवाड्यापर्यंत सगळीकडून आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये महाराष्ट्र दर्शन मला या ठिकाणी घडलं असं म्हणता येईल.

अंधश्रद्धा निर्मूलनविषयी मी अनेकदा आपल्याशी बोललेलो आहे. काही नवीन कार्यकर्ते जे कदाचित पहिल्यांदाच आलेले असतील, यांच्यासाठी नव्याने आणि जुन्या कार्यकर्त्यांसाठी विस्ताराने न बोलता उजळणी म्हणून काही मुद्दे मी आपल्यापुढे ठेवतो. जमिनीवरचं काम करताना गावोगावच्या लोकांच्या समस्या, त्यांचे प्रश्न सोडवण्याचा, लोकांचे प्रबोधन करीत त्यांना मार्गदर्शन करण्याचा तुमचा वर्षानुवर्षांचा अनुभव आहे. गरज पडेल तिथे कायदा वापरण्याचे कौशल्य तुम्ही प्राप्त केले आहे; त्यामुळे मी त्याविषयी काही सांगणार नाही. पहिली गोष्ट म्हणजे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे की, आपण ज्यांच्यासाठी काम करत आहोत त्या भारतीय लोकांच्या मानसिकतेचा, त्यांच्या मनावर रुजवण्यात आलेल्या श्रद्धांचा, त्यातल्या भारतीय समाजरचनेचा विचार करता प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याचे काम आपण हाती घेतलेले आहे आणि प्रवाहाच्या विरुद्ध जाणारे लोकच नेहमी इतिहास घडवत आलेले आहेत. आपल्या समाजामध्ये सुरक्षित राहावे, त्रास नको, कुठला संघर्ष नको म्हणून प्रवाहपतित होण्याचा मार्ग निरक्षर लोकांपेक्षा शिकलेल्या लोकांकडूनच अधिक स्वीकारला जातो. याबाबत महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चिंता व्यक्त केली होती. परंतु आनंदाची गोष्ट यासाठी की मनोबल, इच्छाशक्ती वापरून, प्रसंगी काही गमावण्याची, काही त्रास सोसण्याची तयारी, मनाशी जाण ठेवूनच तुम्ही सगळे जण हे प्रवाहाविरोधी काम करत आहात.

दुसरी एक गोष्ट, परिवर्तनाच्याबाबतीत आपल्याला ज्या समाजात काम करायचे आहे तो सगळा समाज शोषक नाही. त्यातला एक अगदी छोटा, मोजका भाग वेगवेगळ्या अंगाने शोषण करणारा असतो. पण बहुसंख्य म्हणजे साधारण ९०% समाज, एक प्रकारे शोषितच असतो. पूर्णपणे फुलण्याच्या, स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्याच्या कुठल्याही संधीच त्यांना मिळालेल्या नसतात; उपाय, मार्ग सापडलेला नसतो. ज्यांचे परिवर्तन आपल्याला करायचे आहे त्यांचे संस्कार, स्वभाव, त्यांची जगण्याची शैली, त्यांचा वारसा, त्यांचा जीवनप्रवास कोणत्या परिस्थितीतून झालेला आहे, आता कोणत्या परिस्थितीत तो जगतो आहे, अशा गोष्टी समजून घेतल्याशिवाय आपल्याला परिवर्तनाचा मार्ग चोखाळता येणार नाही. हे सर्व तपशिलाने समजून घेणे हेच परिवर्तनाचे शास्त्र आहे आणि त्या शास्त्राच्या सिद्धांतांचा वापर करण्याचे कौशल्य प्राप्त करणे ही कलादेखील आहे. आपण ज्या लोकांच्या मनातल्या, आचरणातल्या अंधश्रद्धा दूर करणार आहोत, त्यांचं निर्मूलन करणार आहोत, त्यांच्यापुढं विज्ञानाचं, कार्यकारणभावाचं महत्त्व सांगितलं, त्यांना तर्काने पटवून देऊन त्यांना निरुत्तर करून पराभूत केलं म्हणजे लोक बदलतील असे नाही.

समोरच्या माणसाच्या मनात पराभूतपणाची भावना निर्माण झाली, तर तो कदाचित निरुत्तर होईल; परंतु त्याचा स्वाभिमान दुखावला जाऊन तुमची मते न स्वीकारता तो तुमच्यापासून दूर जाईल. एखादी भाषा शिकताना कुठे कोणता काळ वापरायचा, कुठे कोणता शब्द वापरायचा, विशिष्ट वाक्प्रयोग कुठे वापरायचा, ही कला शिकायची असते. तशीच परिवर्तनाची प्रक्रिया, त्या प्रक्रियेतील मानसिक अडथळे, सामाजिक व आर्थिक अडथळे, तत्त्वज्ञानाचे अडथळे कोणते येऊ शकतात, श्रद्धा-अंधश्रद्धा आणि समजुतींचे अडथळे कोणते येऊ शकतात, यांचे आकलन करणे हे परिवर्तनाचे शास्त्र आहे.

परिवर्तनाच्या शास्त्राचा व्यवहारात उपयोग करताना व्यक्तिगणिक त्यात काही बदल करणे हा कलेचा भाग आहे. प्रत्येक माणूस त्याच्या सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीनुसार त्याची मानसिक स्थिती, त्याची आकलनक्षमता याबाबतीत वेगळा आहे. ज्याप्रमाणे डॉक्टर प्रत्येक रुग्णाला वेगळे तपासून वेगवेगळे औषध देतो; त्याप्रमाणे वैज्ञानिक दृष्टिकोन, कार्यकारणभाव वेगवेगळ्या व्यक्तींना समजावून सांगताना ते सांगण्याच्या पद्धती, सादरीकरणाच्या पद्धती बदलाव्या लागतील. औषधांच्या मात्रा पुन्हा पुन्हा घ्याव्या लागतात तसे आपल्याला त्याच त्या गोष्टी पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या पद्धतीने मांडाव्या लागतील. हे काम अतिशय धैर्याने, संयमाने करावे लागणार आहे. नवीन तरुण कार्यकर्ते चळवळीत येत असतात. त्यांच्याकडे ऊर्जा असते, त्यांना उत्कंठा असते, उत्साह असतो; परंतु त्याचबरोबर संयमही असला पाहिजे. झटपट क्रांती झाली पाहिजे, असं तरुणपणी वाटणं साहजिक आहे; परंतु ती क्रांती आपोआप होत नसते, ती घडवावी लागते. क्रांती जसे एक शास्त्र आहे आणि त्याचबरोबर ती कलासुद्धा आहे.

लोक का बदलत नाहीत, त्याची अनेक कारणे आहेत. समजा, एखाद्या ६० वर्षांच्या व्यक्तीला जरी बौद्धिकदृष्ट्या पटवून दिलं, तरी आता त्याने आयुष्याच्या या वळणावर माघार कशी घ्यायची? आता त्याची अडचण ही आहे की, कळत्या वयापासून ते साठीपर्यंत ती व्यक्ती एक विचारधारा जगत आलेली आहे, लोकांच्यापुढे तीच विचारधारा आग्रहाने मांडत आलेली आहे. मग आता त्याला पटल्यानंतर माघार घेण्यासाठी, पवित्रा बदलण्यासाठी त्याला काहीतरी अवकाश देणं, वेळ देणं हे गरजेचं असतं. म्हणून एकदा आपण बोललो आणि त्याच्यात बदल झाला असं होऊ शकत नाही. त्या बदलाच्या घाईत त्याला कदाचित पराभवही वाटू शकतो. जी तरुण व लहान मुले-मुली असतात त्यांना वळण लावणं सोपं आहे, त्यांच्यावर संस्कार करणं सोपं आहे. परंतु ज्यांच्या मनावर घट्ट रुजलेले संस्कार आहेत ते एकदम बदलू शकत नाहीत. एक अजून चांगले उदाहरण. हाताला लागलेला चिखल पाण्याने हात धुतला की, लगेच दूर होतो. परंतु त्याप्रकारे हात धुवून हाताला लागलेली मेहंदी दूर होणार नाही. मेहंदी दूर करण्यासाठी आठ-पंधरा दिवसांनी तिचा रंग फिकट होतो, नंतर मग काही दिवसांनंतर पूर्णपणे निघून जाईल. जर काही गोंदलेलं असलं तर इथे मात्र वेगळी प्रक्रिया अवलंबावी लागेल. भारतीय समाजाच्या माणसपटलावर धर्माच्या, नीतीच्या, प्रथा-परंपरा, श्रद्धांच्या नावाखाली खूप काही बरं-वाईट गोंदलेलं आहे. काही चांगलं, काही वाईट असू शकेल, काही अगदीच टाकाऊ, भ्रामक, नुकसान करणारं, तुमची वाट चुकवणारं असं असू शकेल. मग त्यावेळी असे गोंदण जर एखाद्या शस्त्राने घाईने काढण्याचा प्रयत्न केला तर काय होतं? जे बाहेरून लागलेलं गोंदण आहे तेवढंच वेगळं काढता येत नाही. तर त्या माणसाच्या शरीराचं मांस, त्वचा हे सगळंच खरवडलं जातं. मांस, त्वचा माणसाच्या अस्तित्वाचा भाग असल्याने त्याला इजा होते. मग त्या माणसाला वाटतं की, आपल्या अस्तित्वावरच घाला घातला जातो आहे. आपल्या देशातल्या बहुसंख्य लोकांच्या मनावर अंधश्रद्धा या गोंदण पद्धतीच्या लागलेल्या आहेत. त्या जणू व्यक्तीच्या मानसिक अस्तित्वाच्या भागच बनून गेल्या आहेत, म्हणून त्या काढण्याचे काम हे एखाद्या कुशल शस्त्रक्रिया तज्ज्ञाने अतिशय काळजीपूर्वक, जपून, हळुवारपणाने शस्त्रक्रिया करावी; त्याप्रमाणे करावे लागणार आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम आघात करून नाही, तर अतिशय हळुवारपणाने करायचं आहे. याचा अर्थ, तडजोड करायची, आपल्या भूमिका नाकारायच्या, तत्त्वे सोडून द्यायची, असं अजिबात नाही. आपल्या भूमिकांवर आपण ठाम राहायचं आहे आणि आपण निवडलेली मूल्ये अजिबात सोडायची नाहीत. सृष्टीतील

कार्यकारणभावाच्या संबंधाशिवाय घटना घडू शकत नाहीत, हा सिद्धांत अजिबात सोडायचा नाही. प्रयोगशीलता सोडायची नाही. पण दुसऱ्यांशी बोलताना, चर्चा करताना, त्याला पटवून देताना अतिशय काळजीपूर्वक, हळुवारपणाने हे करायचे आहे. मी नेहमी सांगतो की, परिवर्तनाची प्रक्रिया डोक्याकडून हृदयाकडे नाही, तर हृदयाकडून डोक्याकडे आहे. म्हणजे त्या माणसाच्या हृदयामध्ये आधी प्रवेश केला पाहिजे, मैत्री केली पाहिजे, त्याच्या सुखदुःखात सामील झालं पाहिजे. त्याच्या सुखदुःखाची चौकशीदेखील न करता नुसता कार्यकारणभाव आपण त्याच्यावर लादायचा प्रयत्न केला, तर त्यात यश मिळू शकत नाही, असं मला वाटतं.

आता एक शेवटची गोष्ट. आपण सृष्टीतल्या कार्यकारणसंबंधाच्या दृष्टीने जे काही नियम तयार केलेले असतात ते आपण स्वतः अतिशय काळजीपूर्वक पाळले पाहिजेत; म्हणजे हे नियम स्वतःला अतिशय कठोरपणाने लावावेत. आपण त्यांचं जास्तीत जास्त तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न करायचा. पण आपले कुटुंबीय म्हणजे अगदी आई-वडील, भाऊ-बहीण, पती-पत्नी असतील किंवा आणखी कोणी नातेवाईक, मित्र असतील, इतर कोणीही संबंधित असतील; त्या सगळ्यांच्या बाबतीत या नियमांचा सैलपणा ठेवावा. समजा, आपण एक विशिष्ट प्रकारची अंधश्रद्धेची पूजा मान्य करत नाही, तर आपण ती अजिबात घालू नये. पण आपल्या एखाद्या मित्राने, नातेवाईकाने काही विशिष्ट परिस्थितीमध्ये ती घातली तर लगेच त्याच्यावर फुली मारू नये. अनेकदा उत्साही कार्यकर्ते फुल्या मारत जातात की, ह्याने हे केलं, त्याने ते केलं. जेव्हा आपल्या मित्रांच्या घरी जातो तेव्हा त्याच्या घराच्या भिंती तो तपासायला लागतो. तिथे मित्र म्हणूनच जावे; न्यायाधीश म्हणून जाऊ नये. अशाप्रकारे आपलं काम होऊ शकत नाही. त्याला समजावून सांगण्याची वेळ निवडावी आणि संवादाची छान पद्धत प्रत्येकाने आपापली तयार करायची. कोणत्या वातावरणात, कोणत्या परिस्थितीत, आजूबाजूला कोण असताना संवाद साधायचा ते आपणच ठरवावे. चारचौघांत त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केल्यास त्याला ते अपमानास्पद वाटेल आणि यातून काही साधणार नाही. तुम्ही त्याचे हितचिंतक आहात, इतकी मैत्री त्याच्या मनात निर्माण करून, एकांतात त्याच्याशी बोलावे. जबरदस्तीने होणारे हे काम नाही. कळीचं लवकर फूल व्हावं म्हणून आपण दगड टाकून तिला उमलवण्याचा प्रयत्न केला, तर ती उमलणार नाही; ती चिरडली जाईल. हेच माणसांनाही लागू पडते. माणसे नष्ट व्हायला, बरबाद व्हायला तयार होतील; परंतु तुम्ही जबरदस्तीने काही लादले तर ते एकाएकीच आपले विचार सोडून दुसऱ्याच्या विचारांकडे येणार नाहीत. ती कळी ज्या देठावर आहे, मुळांवर आहे त्या मुळांना थोडंसं आळं केलं, त्याला माती, पाणी, हवा दिले तर मुळाला घातलेले ते पाणी त्या मुळातून, त्या देठातून, कळीपर्यंत येतं आणि ती कळी सहज उमलते, तिचं फूल होतं. कळीचं फूल होण्याची प्रक्रिया अशी सहज घडते. ती उमलण्यासाठी जे पाणी जातं, ते कुणाच्याही नजरेला पडत नाही आणि मग कुणाच्या नजरेला टोचण्याचाही प्रश्न निर्माण होत नाही. अशीच परिवर्तनाची प्रक्रिया आहे. तुमचं बोलणं टोचत असेल, तुम्ही तशाप्रकारे जाणवून देत असाल की, मी जास्त शहाणा आहे, मला जास्त कळतं आणि तू अडाणी आहेस, हे जर आपण दाखवत राहिलो तर तो बदलणार नाही. आपण अंगीकारलेले हे काम आधीच अवघड आहे. आपला समाज हजारो वर्षे एक प्रकारच्या गोंदणामध्ये अडकलेला आहे. अशा समाजामध्ये आपल्याला बदल घडवायचा आहे. आपल्याला हवे तसे विधायक स्वरूपाचे, माणसांना जोडणारे, माणसांना अधिक सुखी करणारे, माणसांना स्वतःला आनंदी करायला आणि त्यांनी इतरांनाही आनंद वाटावा यासाठी त्यांना समर्थ करण्याचे आपण प्रयत्न करत असताना विशिष्ट काही एक पद्धत आपण आपल्या मनाशी ठरवली पाहिजे. मी जे काही बोललो तो कोणता सल्ला नाही; तो तुमचा अनुभव असून आपण फक्त त्या अनुभवाची उजळणी केलेली आहे.

मी समारोपात एवढेच म्हणेन, माझ्या दृष्टीने हा अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि तुम्ही जे काम करत आहात, त्या कामाच्या सुरुवातीपासूनच खरं तर मी तुमच्याबरोबरच राहिलेलो आहे आणि जोपर्यंत श्वास असेल तोपर्यंत मी तुमच्यासोबत आहे.

(**शब्दांकन** : प्रल्हाद मिस्त्री, नाशिक)



# जातीय-धार्मिक सलोखा जोपासायला हवा!

**यशवंती शिंदे,** कोल्हापूर
८८३०१७९१५७

''उद्या फारिखचं पप्पा कोल्हापूरला येणार हायतं. त्येंच्यासंगं शिरखुर्मा दिती, तुला लय आवडतूय. तुझं मालक कुठं भेटतील त्येंना?''

''अगं, नको गं. कुठं करत बसते सगळं? किती उशीर लागतो बनवायला! आणि उगाच भैयांना इथपर्यंत आणायचा त्रास कशाला?''

''तरास कसला? असू दी की गं. तुला लय आवडतूय मनून दिती. तुज्या मालकांना अन् पोरांनाबी लय आवडतूय. दिती बग पाठवून. सांग तुज्या मालकाला.''

माझी बालमैत्रीण. शाळेत अभ्यासात हुशार नव्हती. दिसायला खूप सुंदर, गोरीपान. स्वभावानं भाबडी. खूप जीव लावणारी. आईबाबांची गरिबी असल्यामुळे दहावीपर्यंत शिकली आणि चांगलं स्थळ आलं म्हणून तिचं लग्न झालं. सासरी खूप श्रीमंती. त्यांना सुंदर मुलगी आणि चांगली माणसं हवी होती, तशी मिळाली. तिचा संसार खूप छान सुरू झाला. शालेय शिक्षण संपलं. मध्ये बरीच वर्षे गेली आणि शालेय जीवनानंतर जुन्या मैत्रिणींचं भेटणं कमी कमी होत गेलं.

माझ्या लग्नानंतर काही वर्षांनी मी, माझी मुले आणि माझे पती त्यांच्या मित्राने आम्हाला ईदच्या सणाला बोलावले म्हणून गेलो होतो. तिथे गेल्यावर त्यांच्या मित्राच्या आईने ओळख करून घेतली. आम्ही बोलत बसलो होतो. तेवढ्यात आमच्यासाठी सुंदर अशा बाउल्समध्ये शिरखुर्मा, गुलगुले, भजी असं काय काय घेऊन एक स्त्री बाहेर आली. तिने माझ्याकडे पाहिले आणि मला म्हणाली, ''तू यशवंती का, आदनारीची?'' (अर्धनारीचे अपभ्रंश रूप. अर्धनारी हे माझे गाव).

मी म्हटलं, ''होय. तुम्ही कोण? तू शहनाज का?''

तिने मला ओळखलं होतं. ती माझी बालमैत्रीण– शहनाज. अभ्यासात हुशार नव्हती, पण माणसं ओळखायला हुशार. मिठीच मारली आम्ही दोघींनी. ''किती वर्षांनी आपण भेटतोय गं? तू कशी काय आमच्या घरला आली? तुझं मालक कुठं हायतं? तुला लेकरं किती? एकांदी पोरगी हू द्यायची की गं?'' असं करत करत शाळेतल्या गप्पा निघाल्या. कोण कुठे असते, शाळेतल्या कोण कोण मैत्रिणी भेटतात, अशा बऱ्याच आठवणी निघाल्या. जुन्या आठवणी काढून खूप हसलो. अचानक झालेल्या या भेटीने ती आणि मी खूपच सुखावलो होतो. जाताना तिने मला शिरखुर्मा आवडतो म्हणून एका किटलीत भरून दिला. ''घरी जाऊन फ्रीजमध्ये ठेव. सकाळी गरम करून खा'', असं ती म्हणाली.

निरोप घेताना तिच्या सासूबाईंनी मला कुंकू लावले. मी त्यांच्या पाया पडले. त्यांनी मला गळाभेट केली. माझ्या मैत्रिणीनेही मला कुंकू लावले. मी आश्चर्याने म्हटलं, ''तुमच्यात कुंकू कसं काय?'' तिच्या सासूबाई म्हणाल्या, ''मी नवरात्रीचा नऊ दिवसांचा उपास करत असते. तुमच्यासारखं सगळी दसऱ्याची साफसफाई पण आम्ही करतो. तुमच्यातल्या बाया हळदी–कुंकवाला बोलावतात, मी पण मग कुंकू आणून ठेवलं, त्यांना लावायला!'' हे ऐकून मला खूप भारी वाटलं आणि त्यांच्याविषयीचा आदरभाव द्विगुणित झाला.

नमस्कार करून आम्ही निघालो. माझी मैत्रीण घराच्या गेटपर्यंत सोडायला आली. गेटच्या बाहेर गाडीपर्यंत आली अन् हळूच कुणाच्या नजरेला पडणार नाही असं बघून माझा हात हातात घेतला आणि पाचशे रुपयांची नोट माझ्या हातात कोंबली.

मी बघितलं. मी म्हटलं, ''अगं, पैसे कशाला देतेस?'' ''असू दी की गं. तू पयल्यांदा माझ्या घरला आली. तुला तसंच कसं पाठवायचं? अन् सासूला कसं म्हणू, माझ्या मैतरणीला साडी नेसवा. तुला आवडेल तसली साडी घी बघ.'' मी म्हटलं, ''अगं, काय गरज आहे याची? तू भेटली आणि एवढं प्रेमानं मला सगळं

केलंस, ते काय थोडं आहे का?'' त्यावर ती म्हणाली, ''असू दी गं. तुझ्या बहिणीनं दिलं असतं तर नगं म्हणली असती का? मला तर कुठं बहीणबाळ हाय! असू दी बग अन् कुणाला सांगू नकू!'' असं म्हणत पैसे माझ्या हातात कोंबून ती गेटमधून आत गेलीसुद्धा.

मी प्रचंड भावूक झाले. आजही मला आम्ही दोघी भेटलेला दहा वर्षांपूर्वीचा तो दिवस जसाच्या तसा डोळ्यांसमोर उभा राहातो आणि आज तिचा हा निरोप आला, ''तुजं मालक कुठं भेटत्याल गं फारिखच्या पप्पाला? त्येंच्याजवळ तुज्यासाठी शिरखुर्मा दिती. तुला लय आवडतूय.'' तिची आणि माझी मैत्री, जातिधर्मांच्या कृत्रिम भिंती ओलांडून माणूस म्हणून प्रचंड जीव लावत माणूसपण जपत होती.

खरं तर, मी आणि माझ्या मैत्रिणीसारखे अनेक मित्रमैत्रिणी आपल्या समाजात आहेत, ज्यामध्ये एकमेकांचे धर्म, जात, भाषा, प्रदेश, वय महत्त्वाचे ठरत नाहीत. त्यामध्ये फक्त एकमेकांचे स्वभाव, निरागसता, निखळपणा, निर्मळपणा आणि आपुलकीचा, जिव्हाळ्याचा अखंड झरा खळाळत असतो. रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त जीव लावणारी ही नाती. त्यामध्ये कोणी ज्येष्ठ नसते, कुणी कनिष्ठ नसते. कुणी हलके नसते, कुणी भारी नसते.

परंतु अलीकडच्या काही वर्षांमध्ये जातिधर्मांमध्ये विद्वेष वाढविणारी काही विधाने, काही व्हिडिओज, काही घोषणा आपल्याला वारंवार ऐकायला आणि पाहायला मिळतात. मला सांगा, आपल्यापैकी एकाला/एकीला तरी आपल्या मुस्लीम किंवा इतर धर्मीय कुठल्याही मित्रमैत्रिणींची कधी भीती वाटते का? छातीवर हात ठेवून प्रामाणिकपणे उत्तर द्यायला गेलात तर मला खात्री आहे, याचं उत्तर शंभर टक्के 'नाही' असंच असणार आहे.

मला आठवतं, माझ्या लग्नाच्यावेळी अस्लमभैय्यांच्या घरी मला मेहंदी काढली होती आणि दोन्ही हातांना मेंदी लावल्यामुळे भाभींनी मला जेवण खाऊ घातलं होतं. हेच आमच्यातलं प्रेम आजही आहे. त्या मला आपली धाकटी नणंद मानतात. भैय्या मी माहेरी गेले की, आजही ''छोटी, अर्धनारीला आली की घरी ये'', असं प्रेमाने बजावत असतात.

असे असतानादेखील समाजात जातीजातींमध्ये, धर्माधर्मांमध्ये तेढ निर्माण होईल, विद्वेष पसरेल आणि एकमेकांविषयी संशयाचे वातावरण निर्माण होईल, अशी परिस्थिती का निर्माण केली जाते? कोण व्यक्ती या गोष्टी करत असतात? त्यामागे त्यांचा काय हेतू असावा? याचा आपण विचार का करीत नाही?

आपली जातीय, धार्मिक विविधता हेच आपलं वैशिष्ट्य आहे आणि खरं तर हीच आपली संस्कृती आहे. आपल्या गेल्या कित्येक पिढ्या यानुसार एकत्र राहात आल्या आहेत. आपली भाषा, आहार, राहणीमान आणि कपडे घालण्याच्या पद्धतींवरती एकमेकांचा प्रभाव पडलेला आपल्याला दिसून येतो. भारतीय संस्कृती सर्वसमावेशक आहे, म्हणूनच ती जगामध्ये श्रेष्ठ मानली जाते. इथे सर्व जातिधर्मांचे लोक एकमेकांना सामावून घेत, एकमेकांना जीव लावत एकत्र गुण्यागोविंदाने नांदत आलेले आहेत.

मात्र आपल्यापुढे आज जाणीवपूर्वक असे वातावरण तयार केले जात आहे की, आपल्या जातीची, आपल्या धर्माची सोडून प्रत्येक दुसरी व्यक्ती आपली शत्रू आहे. ती आपला धर्म बुडवेल, जात बुडवेल, त्यांची संख्या वाढेल. त्यांची तरुण मुले/पुरुष आपल्या मुलींना बाटवतील, त्यांचे धर्मांतर करतील. आपला देश ताब्यात घेऊन आपल्यावर राज्य करतील.

सगळ्या काल्पनिक गोष्टी! कल्पनेनेच भयंकर दृश्ये निर्माण करायची. कल्पनेतून सिनेमे बनवायचे आणि 'ट्रू स्टोरी' म्हणून समाजमाध्यमांवरती पसरवून भीती निर्माण करायची. घाबरलेला माणूस भीतीच्या मुळाशी जात नाही. प्रतिकार करण्यासाठी भयंकर भासवल्या गेलेल्या गोष्टींना काउंटर भयंकर विचार करू लागतो. समाजात एखाद्या तरुण-तरुणीने आंतरधर्मीय विवाह केला की, त्याला लवजिहादचे रूप द्यायचे. खरं तर, तरुण वयात मुलेमुली प्रेमात पडताना जात, धर्म पाहात नाहीत, हे माहीत असते. मग जाणीवपूर्वक अमुक मुलगा मुस्लीम होता, त्याने हिंदू मुलीबरोबर लग्न केले म्हणत विद्वेष पसरवला जातो.

दोन धर्मांमध्ये तणाव वाढत राहतो आणि या वाढलेल्या तणावाचा उपयोग बहुधा राजकीय फायद्यासाठी केला जातो. सर्वसामान्य नागरिकांचा मात्र

यात बळी जातो, याचा आपण विचार करत नाही. आपण ज्येष्ठ/श्रेष्ठ आहोत. हा देश आमचा आहे. जे संख्येने कमी आहेत, त्यांनी बहुसंख्यांना भिऊनच राहिले पाहिजे, अशा प्रकारचे वातावरण निर्माण केले जाते. सगळ्यात खेदाची गोष्ट म्हणजे हे सगळं करत असताना 'शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा केल्या जातात. शिवाजी महाराजांच्या राज्यात असल्या गोष्टी कधी चालत होत्या? शिवाजी महाराजांनी इतर धर्मीयांचा द्वेष कधी केला? याचा आपल्याला विचार करावासा वाटत नाही.

मित्रमैत्रिणींनो, आज आपण सर्व जण शिक्षित आहोत, सुजाण आहोत. आपणा सर्वांना विचार करता येतो. कार्यकारणभाव तपासता येतो. खरं काय, खोटं काय याची आपणास चिकित्सा करण्याची गरज निर्माण झाली आहे. खूप मोठी व्यक्ती खूप मोठं आणि खोटं बोलत असते, ते बोलणं खरंच तसं आहे का, याची आपण चिकित्सा करत नाही. शिक्षण आपल्याला ज्ञान देते, दृष्टी देते, डोळसपणा देते, विवेक देते आणि विचार करायला प्रवृत्त करते. समाजात घडणाऱ्या, घडवल्या जाणाऱ्या प्रत्येक घटनेकडे आपण ही गोष्ट का घडली? कुणी घडवून आणली? ती कुणाच्या फायद्याची आहे? याची चिकित्सा करायला शिकूया. खऱ्याखोट्याचा सोक्षमोक्ष लावून निदान आपल्या स्वतःपुरतं तरी का होईना, जागरूक होऊया आणि स्वतःबरोबरच आपल्या समाजालाही जागं करण्याचा प्रयत्न करूया.

(लेखक महा.अंनिस कोल्हापूर शहर शाखेच्या कार्याध्यक्षा आहेत.)


●

## मन:पूर्वक अभिनंदन



महा. अनिसचे निधी व्यवस्थापन विभागाचे सहकार्यवाह सुधीर निंबाळकर निर्मित आणि योगदान असलेल्या 'सफरचंद' या मराठी नाटकाला २०२३ चे महाराष्ट्र शासनाचे 'सर्वोत्कृष्ट नाटक' म्हणून प्रथम पारितोषिक रु. ७,५०,०००/- प्राप्त झाले आहे. शासनाची एकूण आठ पारितोषिके या नाटकाला मिळाली आहेत. तसेच झी गौरव, मटा सन्मान, माझा पुरस्कार आणि कलादर्पण पुरस्कार असे एकूण तेवीस पुरस्कार या नाटकाला मिळालेले आहेत. महा. अनिसच्यावतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## सदिच्छा भेट



मा. कृष्ण प्रकाश (अप्पर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य) यांना अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा अंक भेट देताना संजय बनसोडे आणि डॉ. राम घुले (२२ मे २०२३)

# छत्रपती शिवाजी महाराज



**रुपेश शोभा**, गोरेगाव
९००४२८२६६३

आदरणीय, राजे

तुम्हाला पत्र लिहिण्यास कारण की, तुम्ही उभ्या केलेल्या स्वराज्याला आज ३४९ वर्ष पूर्ण झाली आहेत.त्यासाठी सर्वप्रथम तुमचे आणि अखंड महाराष्ट्राचे खूप खूप अभिनंदन.राजे, खरचं तुमचं स्वराज्य कोणाला नकोय. तुमच्या स्वराज्यात रयत आनंदात होती. तुमच्यावर जीव ओवाळून टाकणारे मावळे होते.तुमच्या विचारांवर श्रद्धा ठेवून चालणारे लोक होते. अठरापगड जातीचे लोक गुण्या गोविंदाने राहत होते. तुम्ही कधीच जातीभेद आणि धर्मभेद केला नाही. सर्वांना सोबत घेऊन स्वराज्य उभं केलंय. तुमची लढाई कधीच हिंदू विरुद्ध मुसलमान अशी नव्हती, तर रयतेवर अत्याचार करणाऱ्या सत्तेविरुद्ध होती. असे नसते, तर तुमचे अंगरक्षक मुस्लिम नसते. कुराण आदरपूर्वक तुम्ही मुस्लिम मावळ्यांच्या हातात दिले नसते. पण राजे, तुमच्या या शिकवणीचा आज आम्हाला विसर पडला आहे.राजे, तुमच्या आणि मावळ्यांच्या कष्टामुळेच स्वराज्य उभं आहे. तुमच्या नंतर छत्रपती संभाजी महाराज व कोल्हापुरचे शाहू महाराज यांनी स्वराज्य अबाधित ठेवले. काळ बदलत गेला आणि भारतात लोकशाही आली. लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरवी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही. राजे तुम्ही राजकारण करण्यापेक्षा समाजकारण करत होता. वेळ पडेल तिथे राजकारण करत होतात. म्हणून तुम्ही रयतेचे लोकप्रिय राजे झालात.

आता या स्वराज्यात सगलं उलटं सुरू आहे. जनतेने निवडून दिलेला सेवक स्वतःला राजाच समजतोय. स्वतःचा राज्याभिषेक करून घेतोय. दरबाराच्या बाहेर न्यायासाठी बसलेल्या महिलांना मात्र कैद केली जाते आणि जो आरोपी आहे, तो मात्र दरबारात सन्मानाने बसलेला असतो. छत्रपती संभाजी राजांनी तर त्यांच्या आईवर आरोप लागला असताना त्यांनी त्यांना तो आरोप सिद्ध होईपर्यंत नजरकैदेत ठेवले होते. 'कारभार ऐसे करावा की रयतेच्या भाजीच्या देठासही हात न लावणे' असे आदेश तुम्ही काढले होते आणि आता मात्र शेतकरी आत्महत्या करतोय.हक्कासाठी रस्त्यावर उतरला की,त्याला गाडीखाली चिरडून मारले जाते.त्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होतो. विकासाच्या नावाखाली आदिवासी बांधवांना घरातून ओढत बाहेर काढले जाते. विरोध केला म्हणून लाठीचार्ज केला जातो. आठ वर्षाच्या दलित मुलाला शिक्षकाच्या मडक्यातले पाणी पिला म्हणून शाळेच्या शिक्षकाने इतके मारले की,त्याला जीव गमवावा लागला.साक्षीला तर भर रस्त्यात चाकू व दगडाने मारले. सर्वजण फक्त बघत राहिले. कोणी देखील मदतीला गेले नाहीत. दुसरीकडे बाबासाहेबांची जयंती साजरी केली म्हणून अक्षयचा खून करण्यात आला. आंतरजातीय विवाह केला म्हणून आईने व मुलीच्या भावाने तिचा गळा कापून सेल्फी काढला. खैरलांजी,रोहित,निर्भया अशा कितीतरी घटना आहेत, ज्या आजया स्वराज्यात घडत आहेत.रिंगटोनमुळे कोणाचा जीव घेतला जातो, तर पोरं पकडणारी टोळी समजून २-३ साधूना इतके मारले की,त्यांना जीव गमवावा लागला. सर्वत्र धार्मिक व जातीय द्वेष पसरत आहे. राजे, तुमच्या नावाचा वापर करून राजकारणी त्यांची पोळी भाजून घेतात. तुमच्या नावाचा वापर म्हणजे मतपेटी असे समीकरण आहे.

या सर्वांमध्ये शिवभक्त पण कुठे कमी नाहीत. त्यांनी तर तुम्हाला डोक्यावर घेतले आहे. मात्र डोक्यात घ्यायला त्यांना जमत नाही.ते तर तुम्हाला अवतारी पुरुष समजतात. सामान्य माणूस देखील असामान्य गोष्ट करू शकतो, हे त्यांच्या पचनी पडत नाही किंवा जाणूनबुजून ते हे करीत असतील. एकदा दैवी अवतार बनवलं म्हणजे त्यांच्या सारखं वागणं सामान्य लोकांना जमणार नाही, असे बोलायला मोकळे होतात. कित्येक महामानवांचे जाती-जाती वरून तुकडे केलेत. तुम्हाला देखील एका

**(पृष्ठ क्रमांक २१ वर)**



# विचार तर कराल?

**जगदीश काबरे,** सांगली
९९२०१९७६८०

'विज्ञानामुळे माणसाला भौतिक सुखे जरी मिळाली तरी तो मनःशांती घालवून बसलेला आहे'; असे विज्ञानाला दोषी धरणारे दिलखेचक वाक्य वरवर पाहाता अगदी संयुक्तिक वाटते आणि आपल्या मनाला भावते. पण जरा खोलवर विचार केला असता आपल्या हे लक्षात येईल की, विज्ञान हे साधन आहे, साध्य नाही. म्हणजे असे की, विज्ञान हे भौतिक जगाचा वेध घेणारे एक प्रगत शास्त्र आहे. त्याचा अर्थ, विज्ञानाला कुठल्याही भावभावना नसतात. माणसाच्या हातात ते त्याच्या प्रगतीसाठी मिळालेले उत्तम साधन आहे, एवढेच आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्या साधनाचा उपयोग करणारी भावभावनायुक्त ही माणसे असतात. त्यामुळे विज्ञानाचा उपयोग विधायक करायचा की विघातक करायचा हे माणूसच ठरवतो. विज्ञान नाही म्हणून दोष विज्ञानाला न देता माणसाला द्यायला हवा.

जसे की, बंदूक चालवण्याचं प्रशिक्षण घेतल्याशिवाय बंदूक हाताळण्याची चूक त्याने करू नये. पण केवळ चालवण्याचं तंत्र शिकूनही भागत नाही. बंदूक कधी, कुणावर आणि का चालवावी याची प्रगल्भ जाणीव असणं तेवढंच महत्त्वाचं असतं. त्याचप्रमाणे विज्ञान शिकलो म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन येतोच असे नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनाने जगणारा माणूस हा विज्ञानाचा नक्कीच विधायक उपयोग करतो. अशा वेळेस विज्ञान हे शाप नसून वरदानच ठरते. पण विज्ञानाच्या उद्रेकामुळे त्याला सोय म्हणावं की उणीव? उपयोगी मानावं की उपद्रवी? वेळ वाचवणारं म्हणावं की वेळेचं भान घालवणारं? माहिती पुरवणारं म्हणावं की नको ती माहिती लादणारं? विरंगुळा देणारं म्हणावं की, विरंगुळा कायमचा हिरावून घेणारं? विचारांना वृद्धिंगत करणारं की विकृत करणारं? हेठरवणं सामान्य माणसाला अवघड होऊन बसलेलं आहे. कारण त्याचा मेंदू बुद्धीपेक्षा भावनिक जास्त असतो. हा गोंधळ टाळायचा असेल तर माणसाला वैज्ञानिक दृष्टिकोनच स्वीकारावा लागेल. पण वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अभावामुळे माणूस उच्चशिक्षित झाला तरी धर्मांध, अंधश्रद्धा, चुकीच्या अस्मिता गोंजारणारा, जातीसाठी माती खाणारा आणि आपल्या धर्माची श्रेष्ठता सांगण्यासाठी बेभान होऊन इतर धर्मीयांना तुच्छ लेखणारा असू शकतो. त्याउलट वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस मात्र सर्वसमावेशक वृत्तीचा असतो. प्रत्येक घटनेचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून साधकबाधक विचार करणारा असतो. अशा लोकांचीच आज भारताला गरज आहे.

विज्ञान हे एक शक्तिशाली माध्यम आहे. माध्यम हे तटस्थ असतं; पण माणूस मात्र बरेचदा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाळगणारा असू शकतो. त्यामुळे तो माध्यमाला कसे वापरेल हे त्याच्या वैचारिकतेवर अवलंबून असते. पण आपण अशा माणसाला दोष देण्याऐवजी या तटस्थ, भावना-विरहित असलेल्या माध्यमालाच दोष देण्याची चूक नेहमी करत असतो. हे बदलायला हवे तरच विज्ञानाविषयीचा भयग्रस्त तुच्छतेचा दृष्टिकोन कमी होईल आणि 'विज्ञान जिथे संपते तिथे अध्यात्म सुरू होते', अशी आपली धार्मिक अस्मिता गोंजारणारी बाष्कळ विधाने आपण करणार नाही. कोणत्याही वैज्ञानिक सत्याचा अनुभव, सप्रमाण म्हणजे पुराव्यांसह, वारंवार म्हणजे पुन्हा-पुन्हा, आणि सर्वत्र म्हणजे सगळीकडे येत असतो, यायला हवा. गुरुत्वाकर्षण ही वस्तुस्थिती आहे म्हणून वर फेकलेली वस्तू खालीच येणार, मग तुम्ही ध्रुवावर असा नाहीतर विषवृत्तावर असा. कोणताही निष्कर्ष हा प्रयोगानं तपासून बघता आला पाहिजे हे तर विज्ञानाचं आधारतत्त्वं. 'ज्वलनाला ऑक्सिजनची आवश्यकता असते', असं म्हटलं तर ते सिद्ध करता आलं पाहिजे. मेणबत्ती पेटवून ती उपड्या हंडीखाली ठेवली तर हंडीतला ऑक्सिजन संपल्यावर ती विझते. याचाच अर्थ, तो वायू ज्वलनाला मदत करतो. 'पदार्थाचं आकारमान

वाढलं किंवा वाढवलं तर त्याची घनता कमी होते' असं म्हटलं तर आपल्याला हे करून बघता येतं की, लोखंडाचा पातळ पत्रादेखील पाण्यात बुडतो; पण तो वाकवून त्याला होडीचा आकार दिला की तो पाण्यावर तरंगतो. बर्फ हे पाण्याचं घनरूप; पण ते तयार होताना त्याचं अनियमित प्रसरण होत असल्यामुळे त्याची तुलनात्मक घनता कमी होते आणि तेही पाण्यावर तरंगतं. अशा अनेक उदाहरणांवरून वैज्ञानिक सत्य हे सार्वत्रिक सारखंच असतं हे सिद्ध होतं.

थोडक्यात काय, तर विज्ञान-तंत्रज्ञान भौतिक घटनांची घटिते असतात, म्हणून ते तटस्थ असते. त्याला कुठलेही मानवी गुण लागू पडत नाहीत. त्या अर्थाने विज्ञान-तंत्रज्ञानाला भावना नसतात. विज्ञान तंत्रज्ञानाला दुधारी शस्त्र म्हणतात, त्याचे कारण त्याचा वापर कसा करावा हे माणसाच्या विचारसरणीवर अवलंबून असते. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस त्याचा विधायक कामासाठी वापर करतो. पण ज्याच्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोन नाही तो मात्र विज्ञानाचा स्वार्थासाठी उपयोग करतो. म्हणजेच विघातक उपयोग करतो. म्हणून विज्ञान सुख, समाधान, मानसिक शांती देऊ शकत नाही अशी अज्ञानी मुक्ताफळे उधळली जातात. विज्ञानाच्या दुरुपयोगाची कटू फळे आज आपण पर्यावरणाच्या ऱ्हासाने पाहात आहोतच. पण त्याच वेळेस दुसऱ्या बाजूने शास्त्रज्ञ विज्ञानाचा सदुपयोग करून सामान्यजनांच्या आरोग्यास उपकारक नवनवीन औषधे शोधून त्याचे जीवनमान सुधारत आहेत. तसेच पर्यायी शाश्वत ऊर्जा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन करत आहेत. त्याची फळे आपल्याला काही प्रमाणात दिसू लागलेली आहेत. थोडक्यात काय, तर विज्ञान हे माणसाला नीती-अनितीबद्दल काहीच सांगत नाही. पण वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या माणसाला मात्र आपण घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी घेत नीतीने कसे जगावे, हे चांगल्या पद्धतीने कळते.

(लेखक ज्येष्ठ विचारवंत आहेत.)

●

---

## वाचक प्रतिक्रिया

- मे २०२३च्या अंकात प्रा. तानाजी देशमुख यांनी लिहिलेला 'महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत सत्यशोधक समाजाचे योगदान'हा लेख फार आवडला. सदर लेखांमध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्याद्वारे महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजातील जातीव्यवस्था, मूर्तीपुजा, पुरोहितशाही, धर्मव्यवस्था, ग्रंथप्रामाण्यवाद, धर्मकल्पना, बहुजनांचे होणारे शोषण व मानसिक गुलामगिरी याविरुद्ध बहुजन समाजातील लोकांमध्ये जागृती घडवून आणली. समतामुलक, बुद्धीप्रामाणिकवादी व शोषणमुक्त समाज निर्मितीचा तसेच स्वातंत्र, समता व बंधुता समाजात रुजविण्यासाठी महात्मा फुले यांनी मोलाचे कार्य केले.त्यांचे विचार व कार्य आजच्या काळातही सर्वांना दिशा देणारे व अंनिसमध्ये काम करणाऱ्या आमच्या सारख्या नविन कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे आहे.

**पुरुषोत्तम ठाकरे** (गडचिरोली)

- गणितप्रेमी हा लेख माहितीवर्धक आणि बुद्धिला चालना देणारा आहे. इतर लेख सद्यस्थितीवर भाष्य करणारे व डोळ्यात अंजन घालणारे आहेत.राजर्षी शाहू महाराजांवरिल लेख वाचून त्यांच्याप्रती असलेला आदर अधिक वृद्धींगत झाला.

**अरविंद रामटेके**, वसई

- गणितप्रेमी हा लेख गणित प्रेमींसाठी साठी जणुकाही ज्ञानाची शिदोरीच आहे, गणित कोड्यातून तार्किक क्षमता विकसित होते. या अंकातील बुवाबाजी यातील गरम तव्यावरील सच्चीदानंद गुरुदासा (लेखक - श्री. मच्छिंद्रनाथ मुंडे सर) लेखामधून खूप छान वैज्ञानिक माहिती मिळाली.

**हेमंत बोरसे**, शहादा



# ढोंगी फरीदबाबाचा भांडाफोड

**नरेश आंबिलकर,** भंडारा
९४२३११२१८१

रोगमुक्तीचे हमखास आश्वासन देणारा तसेच कोणी करणी केली हे सांगणारा बाबा म्हणून प्रसिद्ध असलेल्या संजय साठवणे या ढोंगी बाबाचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने भंडाफोड करून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही घटना आहे गोंदिया जिल्ह्यातील चिरेखणी या गावातील आहे. भंडारा–गोंदिया जिल्ह्यात कुणाच्या अंगात आल्यास ते काढण्यासाठी आणि कुणी ही करणी केली हे सांगण्यासाठी स्वत: ला फरीदबाबा समजणारा संजय साठवणे प्रसिद्ध होता. चिरेखणी छोट्याशा गावात असलेल्या या बाबाकडे या भागातील अनेक जण आपल्या समस्या घेऊन येत असत. ज्यांना मूल होत नाही अशांना हमखास मूल होण्याची युक्ती हा बाबा सांगायचा. यासाठी बाबाकडे बायांची रांग असायची. फरीदबाबा अंगात आणणाऱ्या संजय साठवणे याने करणी केलेल्यांची नावे सांगितल्यामुळे या भागातील गावागावात भांडणांना सुरुवात झाली होती. याबाबतची तक्रार या भागातील काही जणांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांच्याकडे केली. या तक्रारीची दखल घेऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा भंडाऱ्याचे कार्यकर्ते कामाला लागले आणि या बाबाचा भंडाफोड करुन दरबार कायमचा बंद करण्यात आला.

सर्वप्रथम या बाबाची माहिती गोळा करण्यात आली यात असे आढळून आले की गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चिरेखणी येथील संजय साठवणे हा अनेक वर्षपासून स्वतःच्या अंगात फरीदबाबा आल्याचे भासवून रोगमुक्त करण्यासाठी तंत्र मंत्र करून राख लिंबू देत होता. कोणी कोणाला भूतबाधा, करणी केली आहे यासाठी तो या परिसरात प्रसिद्ध झाला होता. कोणाला मूल होत नसेल तर त्यासाठी विधी सांगत होता. जेवणात या बाबाने मंतरलेली राख टाकायची त्यानंतर नवरा बायकोने एका ताटात जेवायचे असे केल्यास हमखास मूल होईल याची हमी देत होता. करणी केलेल्यांची नावे सांगत असल्याने गावागावात भांडणांची सुरुवात झाली होती. भांडणात या संजय साठवणे फरीदबाबांचे नाव घेतले जात होते. अंधश्रद्धेतून गावागावात वाद वाढले होते.अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा शाखा भंडारा कडे प्राप्त झाली. या नंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते दशरथ शहारे व नितेश बोरकर यांना बाबाच्या दरबारात चिरेखणी येथे पाठविण्यात आले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते दशरथ शहारे यांने या फरीदबाबाकडे आपली आकत लावली. बाबाकडे पहिल्यांदा नंबर लावण्याच्या प्रक्रियेला आकत लावणे असे म्हटले जाते. दशरथ शहारे यांनी आपल्या



घरच्या व स्वतःच्या समस्या सांगितल्या. कष्ट करूनही घरात सुख शांती नांदत नाही व नेहमी आजारी राहत असल्याचे बाबाला सांगितले. तेव्हा बाबाने डोळे मिटून त्याला त्याच्या घरात काय चालले आहे हे सांगितले. तुझ्या घरी खूप जुनी देवता आहे.ती तुला त्रास देत आहे. तिच्या बंदोबस्तासाठी तुला पुन्हा चिरेखणीला यावे लागेल. बाबाने मंत्र म्हणून राख खाण्यासाठी दिली तू हमखास बरा होशील असे ठामपणे सांगितले. जर तू माझे ऐकले नाही तर तुझे वाईट झाल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी दिली. तंत्र-मंत्र करून घराभोवती राख घालण्यासाठी दिली घराच्या सभोवताल मोहऱ्या व मीठ टाकण्यास सांगितले. यानंतर पंधरा दिवसानंतर दशरथ शहारे यांना पुन्हा दरबारात येण्यास सांगितले.

पंधरा दिवसानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश नागतोडे, चंद्रशेखर भिवगडे, पुरुषोत्तम गायधने हे सर्व तयारीनिशी बाबाचा भंडाफोड करण्यासाठी निघाले. सर्वप्रथम तिरोडा पोलीस स्टेशन येथे फरीदबाबा संजय साठवणे याची तक्रार नोंदविण्यात आली. पोलिसांना सोबत घेवून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची चमू चिरेखणी येथील ढोंगी बाबाच्या दरबारात पोहचली. बाबाच्या दरबारात यावेळी वीस ते पंचवीस ठिकाणाहून आलेले महिला व पुरुष उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते दशरथ शहारे यांनी आपल्याला बाबाच्या राखेमुळे व मंत्रामुळे कोणताही आराम झाल्या नसल्याचे सांगून पोट भयानक पद्धतीने दुखत असल्याचे व चक्कर येत असल्याचे सांगितले. ढोंगी फरीदबाबा संजय साठवणे याने परत मंत्र म्हटले दोन लिंबू दिले. यावेळी बाबा जोराजोरात ओरडू लागला. मला तुझे घर बांधावे लागेल तेव्हाच तुझ्या घरची कुसराई देवता तुला त्रास देणार नाही असे सांगितले. त्याचवेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी पुढे होऊन बाबाला विचारले की बाबा माझे नाव काय आहे? मी कोण आहे आणि कुठून आलो आहे. बाबा तुम्हाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती याबाबत माहिती आहे का अशी विचारणा केली. या प्रश्नामुळे बाबाच्या अंगातील फरीदबाबा निघून गेला आणि माझ्या अंगात काही येत नाही असे संजय साठवणे सांगू लागला. यानंतर लोकांना फसवणार नाही, भांडण लावणार नाही अशी विनंती करु लागला. यानंतर पोलिसांनी जागेचा पंचनामा करून बाबाला तिरोडा पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. याप्रकरणी तिरोडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास कठाळे, पोलीस हवालदार नितेश बावणे, चेतन भैसारे, निलेश ठाकरे महिला पोलीस भूमेश्वरी वराडे यांनी महत्वाची भूमिका बजावली. फरीदबाबा अंगात आणणाऱ्या ढोंगी संजय साठवणे विरुद्ध तिरोडा पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटण कायदा २०१३ चे कलम ३, २ नुसार गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली.

(लेखक महा.अंनिसचे राज्य निमंत्रित आहेत.)

•

---

**(पृष्ठ क्रमांक १७ वरून)**

जातीने बांधून ठेवले आहे. राजे, तुमच्या स्वराज्यात आपुलकी होती.स्वातंत्र्य,समता,बंधुता ही मूल्य जपली जायची.आता मात्र सर्वत्र द्वेष पसरवला जात आहे. विचारवंतांच्या हत्या केल्या जातात. खरा इतिहास सांगितला म्हणून पानसरेंना गोळ्या घालून मारले. राजे या स्वराज्यात तुमचे भक्त पावला पावलावर मिळतील, पण तुमचे अनुयायी मात्र शोधून सापडायचे नाहीत. कारण आजच्या स्वराज्यात प्रतिमांच पूजन आणि विचारांच दफन केले जाते. राजे, एक म्हण देखील रूढ झाली आहे ती म्हणजे 'शिवाजी जन्मावा पण तो शेजारच्या घरात'. स्वराज्याच नावं घेऊन हुकुमशाही चालवण्याचे प्रकार सध्या सुरू आहेत. धर्माचा वापर मतं मिळवण्यासाठी केला जातो आहे.राजे, रयतेचे चाललेले हाल आणि स्वराज्याची झालेली दुर्दशा तुमच्यापर्यंत पोहचावी, यासाठी हे पत्र लिहिले आहे.

तुमचा मावळा


•

# ...आणि अंनिसमुळे विवेकी झालो



**निशांत सुनंदा विश्वास,** कोल्हापूर
९३७०७७१७६०

नमस्कार, मी निशांत सुनंदा विश्वास. (मु. पो. कणेरी, ता. करवीर, जि. कोल्हापूर) मानसशास्त्र विषयाचा पदवीधर असून, माझ्या घरी आई-वडील-भाऊ-भावजय, त्यांची जुळी मुले आणि माझी पत्नी मुक्ता आणि मुलगा निर्मिक राहातो. माझा ई-सेवाचा कोल्हापूरमध्ये व्यवसाय आहे. या कौटुंबिक पार्श्वभूमीनंतर मी कसा घडलो किंवा घडत आहे, ही हितगुज थोडी आपल्यासोबत आणि स्वत:शीच करताना खूप समाधान आणि प्रसन्न वाटत आहे. हे समाधान आणि आनंद मिळण्याचे एकमेव कारण म्हणजे पुरोगामी आणि विवेकी विचारांचा मार्ग. माझं बालपण बऱ्यापैकी आनंदात गेले. प्राथमिक शिक्षणात हुशार विद्यार्थी होतो; पण माध्यमिक शिक्षण थोडं नकोसं झालं होतं मला. कसं तरी बारावी पूर्ण करून पोलीस व्हायचं असं ठरवून पास शब्दापर्यंत पोहचायचो. एन.सी.सी. करीता शहरात म्हणजे राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे कॉलेज करत होतो. या काळात घरात आर्थिक अडचण वाढत गेल्यामुळे काम करणे हे क्रमप्राप्त झालं.



रोज सकाळी सायकलने मी १२ किलोमीटर कॉलेजवर जायचो. ते आटोपलं की, कुरियरचे काम करायचो. खूपदा मी बांधकाम मजूर म्हणूनही राबत होतो. कॉलेज फक्त दाखल्यासाठी होतं, बाकी मी कॉलेजमध्ये जास्त नसायचो. मित्रांसोबत कट्ट्यावर नाहीतर कामावर. मित्रही जेमतेम माझ्यासारखेच आर्थिक परिस्थिती असलेले होते. कॉलेज जीवनात खूप नवीन गोष्टी आयुष्यात घडत असतात, त्याप्रमाणे माझ्याही आयुष्यात त्या घडत होत्या. पण मी कधीही मादक पदार्थांच्याकडे आकर्षिलो नाही. खूप मित्र मिळवायचे असा स्वभाव कायम होता. त्याप्रमाणे खूप मित्र भेटले. मैत्री टिकवणे हेही अगदी प्रामाणिकपणे करत आहे आजदेखील.

पदवीच्या शेवटच्या वर्षी मात्र मी वर्गात बसू लागलो. कारण विषयच माझ्या आवडीचा होता. मानसशास्त्र! माणसं वाचून काढायचं कौशल्य माझ्यात चांगलं होतं आणि आहे. थोडं कवी मन असल्यानं असं बोलतोय; पण या विषयात मला खूपच रस आहे. अगदी प्रामाणिकपणे मी पदवीचे शेवटचे वर्ष पूर्ण केले. आता नोकरीच्या संकल्पना बदलल्या होत्या. शासकीय पंख्याखालची नोकरी मिळावी असं वाटत होतं; पण खूप कष्ट करूनही माझ्या पदरात काहीच पडलं नाही. अभ्यासाला वेळच मिळत नव्हता. कारण मी मजुरीपासून मिळेल ते काम करायचो. कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) मध्ये एका कंपनीमार्फत मी करारबद्ध नोकरीस लागलो. हे माझ्या कुटुंबाला थोडं आर्थिक समाधान देणारं होतं. काही वर्षांनी मी माझं पदवीत्तर सोडलेले शिक्षण पूर्ण करण्याकरिता परत प्रवेश घेतला. शिक्षण चालू होते. मी आज्ञाधारक शिकतही होतो. पण एक मोठे वळण आले आणि माझा अपघात झाला. मी वाचलो; पण शिक्षण राहून गेलं. या संक्रमण काळात माझी नजर चुलत भावाच्या टेबलवर पडलेल्या डॉ. आ. ह. साळुंखे लिखित 'विद्रोही तुकाराम' या पुस्तकावर पडली. संत तुकाराम



म्हणजे माझ्या नजरेत फक्त एक टाळकुट्या कीर्तनकार एवढंच होतं. याला का विद्रोही असे म्हणले असेल आणि विद्रोही म्हटजे या शब्दाचादेखील मला नीट अर्थ माहीत नव्हता. मी त्याला द्रोही असंच जाणून तुक्याच्या विरुद्धच यात काहीतरी असावं म्हणून मी ते उचलून चाळत होतो. भावाला विनंती करून मी ते वाचण्यास नेले. महात्मा गांधींच्या एका फोटोच्या खाली मी एक वाक्य वाचलं होतं, 'त्याच्या प्रेमाची सुरुवात त्याच्या द्वेषापासून होते', हे वाक्य आज मी अगदी तंतोतंत संत तुकोबाबद्दल अनुभवत आहे. ते पुस्तक मी वाचत सुटलो आणि एक एक अक्षर मला तुकोबाच्याजवळ नेण्याचं काम माझा वाटाड्या आदरणीय आ. ह. तात्यांनी केलं. मी अवाक् झालो होतो. पुरता सुन्न झालो होतो. माझ्या विचारात आमूलाग्र बदल होण्याची ती वेळ होती.

माझा जिवाभावाचा मित्र प्रमोद शिंदे हा पण याच विचाराचा; किंबहुना माझ्यापेक्षा जास्त विवेकी विचाराचा. आम्ही दोघांनी ठरवले की, सामाजिक चळवळीत काम करायचे. पण संघटना अशी हवी की, जी संविधानावर आधारित काम करेल. त्या संघटनेत सर्व वर्गातील, घटकातील लोक काम करत असतील. त्यावेळी आम्हाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीपेक्षा वेगळी संघटना कोणती वाटलीच नाही. नेटवर सर्च करून काही नंबर शोधले. कॉ. गोविंद पानसरेंच्या ऑफिसवर मीटिंग असते त्यावेळी तुम्ही तिथे भेटा, असे सुचवले गेले. तिथे सुनिल स्वामी सर भेटले आणि त्यांनी कृष्णात कोरे सरांची भेट घडवून दिली.

कोरे सरांच्या स्वभावाच्या प्रेमात पडत गेलो. संघटनेचे कोणतेही काम असले की, पुढं पुढं होऊन करू लागलो. खूप मजा येत होती. अगदी ८५ वर्षांपासून ते १६ वर्षांची लोकं कोणताही स्वार्थ न ठेवता आपल्याला जमेल तसं काम करत होती. तेही अगदी हसत-खेळत. अंनिस म्हणजे एक पूर्ण परिवार होऊन गेला. खूप वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक मित्र होऊ लागले होते. अंनिसची व्यापकता इतकी प्रचंड आहे की, स्वत:ला देखील परिपूर्ण करते. लग्नाबद्दल माझ्या मनात नकारात्मक विचार होते; पण कोरे सरांनी मला विवाहाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहायचं कसं ते शिकवलं. माझा आंतरजातीय प्रेमविवाह नोंदणी पद्धतीने झाला. या सुखदु:खाच्या क्षणात प्रमोद आणि कृष्णात स्वाती आमच्यासोबत खंबीरपणे उभे राहिले. माझा सध्या चालू असलेला ई-सेवा व्यवसायदेखील कोल्हापूर जिल्ह्यातील अंनिसच्या प्रिय साथीमुळेच आहे.

माझं गाव हे आर.एस.एस.चा अड्डा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्या गावात आम्ही ग्रामपंचायतसमोर अंनिसचे चार मोठे कार्यक्रम केले. अगदी आपले अभ्यासू साथी डॉ. नितिन शिंदे सरांचे सडेतोड व्याख्यानही याच ठिकाणी आयोजित करण्यात आले. आज गावात अंनिसचा कार्यकर्ता, अशी ओळख होताना कमालीची ऊर्जा मिळत आहे. अंनिसमुळे माझे एक प्रभावी व्यक्तिमत्त्व घडले, अशी इतरांच्याकडून प्रशंसा ऐकताना समाधान वाटते. समाजातील प्रश्नांना सोडवण्याचा प्रयत्न करण्यासाठी आपल्या संवेदनशीलतेमुळे कृतिशील प्रयत्न करण्यात अंनिसमुळे वाव मिळाला. या प्रवासात मोलाची साथ देणारे सुनिल स्वामी, संघसेन जगतकर, कपिल मुळे, इंद्रायणी पाटील, संजय रेंदाळकर आणि कोल्हापूरसोबत महाराष्ट्रभरातील आपले सर्व साथी. आज महाराष्ट्रात कोठेही एकटे वाटत नाही, हे केवळ डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या अंनिसमुळे शक्य झाले. आपले सगळ्यांचे प्रेम आणि विश्वास असाच राहो. अंनिससोबत प्रत्येक वर्गाला सोबत घेवून आपले पाऊल प्रगतीकडे पडत राहील. विवेकाचा आवाज बुलंद होत राहील!

(लेखक महा. अंनिसचे जिल्हा कोल्हापूर कार्यकारणी सदस्य आहेत.)

# कार्यकर्त्यांना उर्जा देणारी राज्य बैठक

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची तीन दिवसाची विस्तारित राज्य कार्यकारिणी कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा येथील संजीवनी पब्लिक स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. राज्यभरातून दोनशेहून हून अधिक संघटनेचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत विविध विभागांच्या चर्चा, पुढील नियोजन आणि त्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आले.प्रत्येक जिल्ह्याच्या कामांचा आढावा घेण्यात आला. या राज्य बैठकीची सुरुवात शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करून करण्यात आली तसेच गेल्या सहा महिन्यात मृत्यू झालेल्या साथींना आदरांजली वाहण्यात आली. कोल्हापूर जिल्हा कार्याध्यक्ष रेश्मा खाडे यांनी स्वागत तर, प्रस्ताविक राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती यांनी केले. कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी उदघाटन केले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे होते.

या वेळी डॉ. हिर्डेकर म्हणाले की, अंनिसचे काम व्यापक व आव्हानात्मक आहे,सध्या प्रतिगामी, सनातनी विचारांचा जोर वाढत आहे, अंनिस सह सर्वच पुरोगामी लोकांनी अधिक सजग राहिले पाहिजे. विवेकी विचार करणाऱ्या माणसांची संख्या वाढली पाहिजे.आपली संघटना मजबूत करून लढाऊ, लिहणारे कार्यकर्ते तयार झाले पाहिजेत.

माणसांची मने घडविण्याचे काम आपली संघटना करते. कार्यकर्त्यांनी अधिक सक्षम राहिले पाहिजे, असे मत राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी व्यक्त केले. यावेळी राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, नंदकिशोर तळाशिकर, डॉ. ठकसेन गोराणे, गजेंद्र सूरकार, राज्य सरचिटणीस विनायक सावळे, विजय परब, रुक्साना मुल्ला, कृष्णात स्वाती, सुधाकर काशीद, सचिन थिटे, ॲड. रंजना गवांदे उपस्थित होते.

राज्य बैठकीत जेष्ठ विचारवंत, लेखक किशोर बेडकिहाळ (सातारा) यांचे विशेष सत्र आयोजित केले होते. आपल्या मार्गदर्शन व्याख्यानात किशोर बेडकिहाळ यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या सोबत केलेल्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. 'डॉ.नरेंद्र दाभोलकर हे केवळ अंधश्रद्धा निर्मूलन कामाशी निगडित नव्हते तर समाजातील व्यापक परिवर्तनाच्या विविधसंघटनांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता.' आपल्या देशात मागील नऊ वर्षांपासून धार्मिक उन्माद वाढत आहे. लोकांच्या धर्मिक, भावनांना, धर्मश्रद्धांना हात घालून त्यांची फसवणूक केली जात आहे. विशिष्ट धर्माचा उदोउदो करण्यामुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होत आहे. आपल्या कार्यकर्त्यांच्या पुढे हे मोठे आव्हान उभे ठाकलेले आहे. बेडकिहाळ पुढे म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेली मूल्ये बाजूला केली जात आहेत, जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. एनसीईआरटीच्या पुस्तकातून लोकशाहीचा पाठ कमी केला आहे. अभ्यासक्रमात बदल होत आहेत. वैज्ञानिक विचार पद्धतीला, चिकित्सेला कमी स्थान दिले जात आहे. फल ज्योतिषाचा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या सगळ्या बाबींचा विचार करता आपण अधिक काम केले पाहिजे, सतत प्रबोधन करत राहावे लागणार आहे.' या विस्तारित राज्य कार्यकारणी बैठकीपासून जिल्हा अहवाल सादर करताना जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्या मंचावर बोलवण्यात आले. त्यांच्या साक्षीने जिल्ह्यातील कामाचा आढावा, पुढील नियोजन याबाबत चर्चा झाली. उपस्थित सर्व जिल्ह्यांनी संक्षिप्त अहवाल दिले, अनेक जिल्ह्यांनी सविस्तर आणि सुंदर अहवाल तयार केले होते. विविध विभागांचा आढावा घेऊन, चर्चा करून,काही निर्णय घेण्यात आले.

**१) दस्तऐवज संकलन विभाग :** या विभागाचे राज्यकार्यवाह डॉ. सुरेश बिऱ्हाडे यांनी या विभागाचा अहवाल मांडला. संघटनेचा राज्यातील सर्व डाटा एकत्र करण्यासाठी दस्तऐवज संकलनाचा एक स्वतंत्र व्हॉट्स ॲप ग्रुप बनवावा, त्यामध्ये राज्यभरातील कार्यकर्त्यांनी आपले कार्यक्रम, उपक्रम याची थोडक्यात माहिती पाठवावी. राज्याच्या दस्तऐवज संकलनासाठी एखाद्या एम. एस. डब्लु. झालेल्या तरुणास फेलोशिप देऊन काम पूर्ण करावे. माहिती गोळा करण्यासाठी गुगल फॉर्म करून घ्यावा. या कामात प्रत्येक जिल्ह्याने योगदान द्यावे.

**२) कार्यालयीन व्यवस्थापन विभाग :** या विभागाचे राज्य

कार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांनी राज्य कार्याध्यक्षांच्या कार्यालयीन व्यवस्थापनाच्या गरज सांगितल्या. बैठकीत राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांच्या निवासस्थानी कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करावी. कार्यालय अद्यावत करावे, तिथे पूर्ण वेळ संगणकाचे चांगले कौशल्य असलेल्या व्यक्तींची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यभर आपले जे जे उपक्रम होतात, बुवाबाबांचा भांडाफोड होतात त्याची माहिती कार्याध्यक्ष कार्यालयास दिली पाहिजे.

**३) विवेक वाहिनी विभाग :** या विभागाच्या राज्य कार्यवाह प्राचार्य. डॉ. सविता शेटे यांनी या विभागाच्या आजपर्यंतच्या कामाची सविस्तर माहिती दिली.यापुढील चार महिन्यात प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन महाविद्यालयांमध्ये विवेक वाहिनीचे कामकाज सुरू करावे, असे ठरले. त्यासाठी आत्ताच डॉ. सविता शेटे यांच्याकडे प्रत्येक जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील महाविद्यालयांची नावे द्यावीत. विवेक वाहिनीची पुस्तिका छापून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक, प्रत्येक विभागाचे शिक्षण उपसंचालक यांना याबाबतचा पत्रव्यवहार करून त्यांचे रीतसर पत्र घ्यावे, असे ठरले. राज्यस्तरीय चर्चासत्र घेण्यात यावे असेही ठरले.

**४) विविध उपक्रम विभाग :** या विभागाचे कार्यवाह अनिल करवीर व सहकार्यवाह रामदास देसाई यांनी उपक्रमांचा आढावा घेऊन पुढील नियोजन सांगितले.

२० ऑगस्ट २०२३ ला शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनाला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक शाखेने निषेध नोंदवायचा आहे. डॉ. दाभोलकरांच्या खूनाच्या तपासात झालेली अक्षम्य दिरंगाई, तपासाची आणि न्यायालयीन प्रक्रियेची मंदगती याबाबत निषेध व्यक्त करणे आवश्यक आहे.त्यासाठी निषेध मोर्चा, सभा, निर्धार मेळावे घ्यावेत. शासनाला निवेदने द्यावीत. २० ऑगस्ट २०२३ रोजी पुण्यामध्ये राज्याचा कार्यक्रम होईल. १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता विठ्ठल रामजी शिंदे पुलावर मेणबत्त्या प्रज्वलित करून प्रबोधनाची गीते सादर केली जातील. २० ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता पुलावर अभिवादन कार्यक्रम होईल. तिथून निर्भय फेरीने एस एम जोशी फाउंडेशनला जातील. फाऊंडेशनमध्ये राज्य निर्धार मेळावा/परिषद होईल. असे कार्यक्रम निश्चित करण्यात आले. प्रत्येक शाखेतील कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात आपला सक्रीय सहभाग नोंदवायचा आहे. ९ ऑगस्ट रोजी संघटनेचा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात शाखा, जिल्हा स्तरावर करायचा आहे. तसेच जादूटोणा विरोधी कायद्यालाही दहा वर्षे पूर्ण होत आहेत, त्याबाबत ही व्यापक प्रबोधन करायचे आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे जीवन कार्यावर एक पुस्तिका काढण्याचे ठरले. त्याचे प्रकाशन २० ऑगस्ट २०२३ रोजी होईल.

**५) युवा सहभाग विभाग :** या विभागाच्या राज्यकार्यवाह प्रियांका खेडेकर यांनी मागील चार महिन्यांच्या कामाचा अहवाल सादर केला. आठवड्यातील प्रत्येक शुक्रवारी क्रियाशील युवा संवादाची मिटिंग ऑनलाईन होत असते, त्यास चांगला प्रतिसाद आहे. युवांच्या आरोग्य जगृतीसाठी काही उपक्रम राबवावे असे सुचवले. युवांना जोडून घेण्याला प्राधान्य द्यावे. जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२५ हे वर्ष संविधान स्वीकृतीचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्या निमित्ताने शाळा, कॉलेजमध्ये काही व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करावीत, या विभागाच्या वतीने जिल्हा संवाद भेटी आखण्यात येणार आहेत. युवांनी अंनिपसाठी लेखन करावे. ३० वर्षापेक्षा कमी वयाची मुले मुली प्रत्येक शाखेत, प्रत्येक जिल्ह्यात व राज्य स्तरावर जोडून घेणे यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल.

**६) वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प :** या विभागाचे राज्य सहकार्यवाह प्रकाश कांबळे व विलास निंबोरकर यांनी मागील चार महिन्यात झालेल्या कामाची माहिती दिली. स्वयं अध्ययन परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तपासून झाल्या आहेत. जळगाव, गडचिरोली, नाशिक, मुंबई, या ठिकाणी दर कोटेशन मिळवावेत आणि त्यानंतर छपाईसाठी प्रश्नपत्रिका द्याव्यात, असे ठरले. सदरचा उपक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक खर्चाची चर्चा करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्याने आपली नोंदणी सहकार्यवाह यांच्याकडे नोंदवावी. स्वयंअध्ययन प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी माध्यमातून छापाव्यात, असाही निर्णय झाला. महिला शिक्षकांचे स्वतंत्र शिबिर घेण्यात येणार आहे. पुढील पहिल्या सत्रांमध्ये प्राथमिक आणि

माध्यमिक शिक्षकांची दोन प्रशिक्षण शिबिरे प्रत्येक जिल्ह्याने आयोजित करावीत, असे ठरले. मुक्त विद्यापीठामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचा अभ्यासक्रम (सर्टिफिकेट कोर्स) सुरू करण्यासाठी डॉ. गोराणे यांनी संघटनेच्या वतीने प्रस्ताव सादर करण्याचे ठरले.

**७) प्रशिक्षण विभाग :** राज्य कार्यवाह सुरेश बोरसे यांनी नवनिर्वाचित जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव यांचे वर्धा व पुणे येथे झालेल्या प्रशिक्षण शिबिराबद्दलची सविस्तर माहिती दिली. ही प्रशिक्षणे चांगली झाली, कार्यकर्त्यांना खूप भावली आहेत. अजून ज्या जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव यांनी प्रशिक्षण घेतले नाही त्यांचे प्रशिक्षण शिबिर ८ आणि ९ जुलै २०२३ ला नाशिक येथे घेण्याचे ठरले. प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधानसचिव व त्या जिल्ह्यातील जिल्हा पदाधिकारी व राज्य पदाधिकारी यांनी त्या जिल्ह्यातील प्रत्येक शाखेत जाऊन, कार्यकर्ता प्रशिक्षण घ्यावे, असे ठरले. राज्य पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही लवकरच घेतले जाईल.

**८) विज्ञानबोध वहिनी :** राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे आणि बाबा हालकुडे यांनी विभागाचा आढावा घेतला. मुंबई, पुणे, इस्लामपूर येथे आयोजित केलेल्या फिरत्या नभांगणाच्या उपक्रमाची माहिती दिली. पुढील शैक्षणिक सत्रात शाखांनी या कार्यक्रमाचे आयोजन करावे. स्वतःचे नवीन नभांगण घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी मदत करण्याबाबत आवाहन केले. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला.

**९) बुवाबाजी विरुद्ध संघर्ष विभाग :** विभागाचे सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी आढावा घेतला. अध्यात्मिक बुवाबाजी बाबत व्यापक प्रबोधन करण्याची गरज आहे. धीरेंद्र शास्त्री आणि प्रदीप मिश्रा, निर्मलामता, यांच्यासारख्या अवैज्ञानिक दावे करणाऱ्या बुवांच्या विरोधात तक्रारी दाखल केल्या पाहिजेत. जादूटोणा विरोधी कायद्याची पुस्तिका नव्याने छापण्याची गरज आहे. त्या लवकर छापून घेण्याचे ठरले.

**१०) प्रकाशन व वितरण विभाग :** या विभागाचे सहकार्यवाह नवल ठाकरे यांनी विभागाची माहिती दिली. या विभागाची बैठक न होणे, पुस्तक निर्मितीस होणारा विलंब, पुस्तके आणि जमा खर्चाचा हिशोब वेळेत पूर्ण करण्याबाबत चर्चा झाली. पुस्तकांचे पैसे जमा होताच संबंधितांना पुस्तके लगेचच मिळाली पाहिजे, त्यासाठी विभागाने तत्पर रहावे.पेरियार यांचे अनुवादित पुस्तक, संघटना बांधणीचे (विनायक सावळे), भानामतीच्या कथा आणि व्यथा (माधव बावगे), मानसिक आरोग्य (डॉ. प्रदीप जोशी), बुवांचा भांडाफोड (विष्णुदास लोणारे), जादूटोणा विरोधी कायदा सचित्र पुस्तिका छापून घेणे, जोडीदाराची विवेकी निवड (आरती नाईक), अवयवदान (सुशील मेश्राम) यांची दुसरी आवृत्ती, आदी पुस्तके पुढील काळात टप्प्या टप्प्याने प्रकाशित करण्यात येतील. प्रकाशन व वितरण व्यवस्था व्यावसायिक दर्जाची केली पाहिजे. पुस्तकांचे सतत प्रमोशन केले पाहिजे. पुस्तक निवड समितीकडून पुस्तक मंजूर झाल्यावर पुस्तक छापण्यास जाईल. पुस्तक निर्मितीची जबाबदारी अं. नि प. कार्यालयाकडे देण्याचा निर्णय बैठकीत झाला. या विभागाने पुस्तक विक्री, प्रचार, प्रसार करावा.

**११) सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग :** विभागाचे कार्यवाह मनोहर जायभाये यांनी आढावा घेतला. हा विभाग रिंगणनाट्य, गाणी यांचे प्रशिक्षण आयोजित करणार आहे. आटपाट संस्थेने सहकार्य केल्यास विवेक फिल्म फेस्टीवल आयोजित केला जाईल. 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' या उपक्रमात आपली संघटना अनेक वर्षापासून सहभागी आहे, जे कार्यकर्ते यात सहभागी होणार असतील त्यांनी नोंदणी करावी. दि. १८ जून २०२३ रोजी उंडवडी (बारामती) पासून १२ कि.मी. पायी चालणे आहे. पनवेल शाखेने तयार केलेले कला प्रदर्शन आपल्या शाखेत, जिल्हाच्या ठिकाणी आयोजित करावे.

**१२) सोशल मीडिया विभाग :** राज्य कार्यवाह किर्तीवर्धन तायडे यांनी आपल्या विभागाचा अहवाल मांडला. संघटनेची वेबसाईट प्राथमिक अवस्थेत आहे, ती वेबसाईट लवकरच अद्यावत होईल. फेसबुक, युट्युब, इंस्टाग्राम ही माध्यमे चालू आहेत, त्यास अधिक सक्रिय करण्यासाठी तज्ज्ञ कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे. संत समाज सुधारकांच्या, विशेष दिवसाच्या इमेज केल्या जातात, त्या अधिक प्रसारित झाल्या पाहिजेत. अशा इमेजेसची बँक करावी. आपले यु ट्यूब न्यूज चॅनल सुरू करण्यात येईल. आपल्या विचारांचे छोटे छोटे व्हिडिओ

कार्यकर्त्यांनी तयार करावेत म्हणजे त्याचा चांगला प्रसार करता येईल. प्रभावी सोशल मीडिया वापरण्याबाबत ऑनलाईन किंवा ऑफलाईन प्रशिक्षण घेतले जाईल. हा विभाग सतत अद्यावत राहील यासाठी गरज पडली तर स्वतंत्र कार्यकर्ता नियुक्त करावा, अशी चर्चा झाली.

**१३) कायदा व्यवस्थापन विभाग :** राज्य कार्यवाह ॲड.मनीषा महाजन यांनी आपल्या विभागाचा आढावा घेतला. दोन्ही कायद्याचे नियम बनवण्याबाबत पाठपुरावा गरजेचा आहे. सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा प्रचार प्रसार स्वतंत्र समिती करणे. शासकीय जादूटोणा विरोधी कायदा प्रचार प्रसार समितीवर अविनाश पाटील व ॲड.रंजना गवांदे यांनी सक्रिय राहणे, जादूटोणा विरोधी कायद्याच्या प्रचार प्रसारासाठी पत्र दिल्याचे व नियम इतर कामाचा पाठपुरावा यांच्या सद्यस्थिती बाबत माधव बावगे यांनी सांगितले. कार्यकर्त्यांसाठी लवकरात लवकर मार्गदर्शन पुस्तिका करण्याचे ठरले. ॲड. रंजना गवांदे यांनी मोहटादेवी विरुद्धची आणि इंदुरीकर महाराज देशमुख यांच्या विरुद्धच्या केसेसची सद्यस्थिती सांगितली. उर्वरित जिल्ह्याचे अहवाल सादरीकरण झाले.

**१४) महिला सहभाग विभाग :** राज्य कार्यवाह आरती नाईक यांनी पीपीटी ने आपल्या विभागाच्या कार्यक्रमांची व पुढील नियोजित कार्यक्रमाची खूप चांगली मांडणी केली. महिला कुस्तीगीर यांच्या आंदोलनाला पाठिंबा व त्यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी कोल्हापुरात ४ जून रोजी धरणे आंदोलन व प्रधानमंत्री व केंद्रीय गृहमंत्री यांना निवेदन दिले. आगामी काळात जून मध्ये वटपौर्णिमा निमित्त शाखा व जिल्हा शाखांनी आपल्या पातळीवर चर्चा, मुक्त संवाद, मुलाखती, सर्प प्रबोधन, ऑनलाइन प्रचार राबवणे, ऑगस्टमध्ये खास महिला कार्यकर्त्यांसाठी चमत्कार सादरीकरण स्पर्धा घेण्याचे तसेच भारत जोडो युवा अकॅडमी व महा. अंनिसच्या वतीने महिला आरोग्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन यावर नांदेड जिल्ह्यात परिषद घेण्याबाबत चर्चा झाली.

**१५) अंनिप प्रकाशन व व्यवस्थापन :** अं. नि. पत्रिकेचा लक्ष्यवेधी पुरस्कारवितरण सोहळा दिमाखात पार पडला. अंनिप चे संपादक प्रा. नितीन शिंदे यांनी निवेदन केले. कार्यकर्त्यांना देणगी जाहिरातीबाबत प्रोत्साहित केले, त्यांचे कौतुक केले. कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी कार्यकर्त्यांनी लिहिते झाले पाहिजे असे आवाहन केले. व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर यांनी पत्रिकेच्या हिशोबाबाबत निवेदन केले. १०० टक्के वसुली करण्याचे ध्येय गाठले जाईल.

**१६) निधी व्यवस्थापन विभाग :** या विभागाचे राज्य कार्यवाह परेश शहा यांनी जमाखर्चा बाबत माहिती देताना कार्यकर्त्यांनी हिशोब व्यवस्थित पाठवावा. जेवढी रक्कम विवेक जागर ट्रस्टला पाठवली जाईल त्याचे सविस्तर विवरण द्यावयास हवे. धनादेश व रक्कम बँकेत जमा केल्यास त्याची काउंटर स्लीप अथवा तिची प्रत विवरणासह पत्रिका कार्यालयास पाठवावे. ऑनलाइन पाठवल्यास त्याचा युटीआर/युपीआई  नंबर व त्याची तारीख सविस्तर लिहून पाठवावे, असे सांगून २०२२ पर्यंतचा ऑडिट रिपोर्ट सादर केला.

**१७) राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय समन्वय विभाग :** राज्य कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी आपल्या विभागाचा सविस्तर आढावा घेतला. राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय पातळीवर संवाद वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे प्रा. घोडेराव यांनी सांगितले.

**१८) मानसिक आरोग्य प्रकल्प विभाग :** या विभागाचे मेंटॉर विनायक सावळे यांनी विभागाचा आढावा मांडला. डॉ. प्रदीप जोशी यांचे मानसिक आरोग्यवरचे पुस्तक छापायचे ठरले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मित्रांची संख्या वाढविली पाहिजे.

या विस्तारित राज्य कार्यकारिणी मध्ये जिल्ह्याचा अहवाल मांडताना त्या जिल्ह्यातील आलेले सर्व कार्यकर्ते याना स्टेजवर बोलावण्यात आले. अहवाल मांडताना कार्याध्यक्ष यांनी सर्वांची ओळख करून देवून जिल्ह्याचा अहवाल मांडावा व प्रधान सचिवांनी पुढील नियोजन मांडावे अशी अहवाल वाचन पद्धती यापुढे राहील.

समारोप राज्य अध्यक्ष अविनाश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर, कॉ. दिलीप पवार, कॉ. बी. एम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कॉ. पवार म्हणाले की, ‘अत्यंत संयमाने अं. नि. स. कार्यकर्ते काम करतात, त्यांच्या कामात सातत्य राहिले आहे. कोणत्याही परिस्थितीत निराश न होता जोरकसपणे काम केले पाहिजे.अविनाश

पाटील म्हणाले, 'संघटनेसाठी योगदान दिलेल्या सहकाऱ्यांचे कौतुक करण्याची परंपरा पुढे चालू राहू द्या. आपले संघटन अधिक वर्धिष्णू बनविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. नवीन कार्यकर्ते घडवण्याचे सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत'.

या बैठकीसाठी कृष्णात स्वाती, हर्षल जाधव, रामदास देसाई, रेश्मा खाडे, दिलीप कांबळे, हरी आवळे, भास्कर सुतार, निशांत शिंदे, मुक्ता शिंदे, स्वाती कृष्णात, संघसेन जगतकर, राहुल सुतार, प्रमोद शिंदे, अमृता जाधव, प्रतिज्ञा कांबळे, प्रा. अरुण शिंदे, प्रा. मांतेश हिरेमठ यांनी संयोजनात सक्रीय परिश्रम घेतले.

या बैठकीला आवर्जून कॉ. बाबा आरगडे, हरिदास तम्मेवार, नितीन राऊत, प्रा.शामराव पाटील, कॉ. अतुल दिघे, सुरेश शिपूरकर, निहाल व तनुजा शिपूरकर, संजय खुर्द, वीणा खुर्द कॉ. दिलीप पवार, विशाल लोंढे (सहायक आयुक्त समाज कल्याण ), राजाभाऊ शिरगुप्पे, अनमोल कोठाडिया, उमेश सूर्यवंशी आदिंनी सदिच्छा भेट दिली. सायंकाळी ताराराणी पुतळ्याजवळ महा. अंनिसच्या महिलाच्या पुढाकाराने महिला कुस्तीगीर आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी धरणे आंदोलन करून जिल्हाधिकारी यांचे मार्फत पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले.

राज्यबैठकीचे उत्कृष्ट संयोजन केल्याबददल कोल्हापूरच्या साथींचा गौरव करण्यात आला. संजीवनी संस्थेने पूर्ण सहकार्य केले होते. संस्थेचे प्रमुख पी. एन. भोसले, एन. आर. भोसले यांनी मोलाचे सहकार्य केले, याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

हम होंगे कामयाब गीताने बैठकीचा समारोप झाला.

**शब्दांकन : संजय बनसोडे, डॉ. टी. आर. गोराणे**

●




या राज्यकार्यकारिणी मध्ये जेष्ठ विचारवंत प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी लिहिलेल्या 'गयासुर आणि महिषासुर' या पुस्तकाचे प्रकाशन महा. अंनिसचे राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांच्या हस्ते झाले, तर 'शब्दांच्या बाबतीत जे खटकले ते मांडले' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा.(डॉ.) प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रा. (डॉ.) आ. ह.साळुंखे, माधव बावगे, अविनाश पाटील, संजीवनी संस्थेचे पी. आर. भोसले, एन. आर. भोसले, प्रा. शामराव पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित मेधावी यांनी केले.

बैठकीच्या निमित्ताने भाई एन. डी. पाटील परिसर, विकास सावंत प्रवेशद्वार, साथी के. डी. खुर्द विचारमंच, अरुणराव पाटील सभागृह, विनायक चव्हाण नोंदणीकक्ष, गंगाराम कांबळे भोजन कक्ष, असे नामकरण करण्यात आले होते.

# विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक, पन्हाळा (कोल्हापूर)

## जिल्हा आणि विभागाचे अहवाल सादर करताना




कॉ. बाबा आरगडे यांचे स्वागत करताना
कार्याध्यक्ष माधव बावगे




नवी मुंबई जिल्ह्याचा अहवाल मांडताना अमोल वाघमारे
सोबत महेंद्र राऊत व अशोक निकम



औरंगाबाद जिल्ह्याचा अहवाल सादर करताना
भास्कर बनसोडे




भंडारा जिल्ह्याचा अहवाल सादर करताना
नरेश आंबिलकर व विष्णूदास लोणारे



उस्मानाबाद जिल्ह्याचा अहवाल सादर करताना
अरविंद शिंदे



रत्नागिरी जिल्ह्याचा अहवाल सादर करताना
सुहास शिगम



गडचिरोली जिल्ह्याचा अहवाल सादर करताना
जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे व इतर कार्यकर्ते




प्रशिक्षण विभागाची मांडणी करताना
राज्य कार्यवाह सुरेश बोरसे



# पुस्तक प्रकाशन आणि लक्ष्यवेधी पुरस्कार समारंभ

**प्रल्हाद मिस्त्री,** नाशिक
९४२०९१५९५७

## पुस्तक प्रकाशन समारंभ

पन्हाळा येथील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत दि. ३ जून २०२३ रोजी दुसऱ्या सत्रात पुस्तक प्रकाशन समारंभ संपन्न झाला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे, संजीवन शैक्षणिक संकुलाचे संस्थापक पी. आर. भोसले, महाराष्ट्र अंनिसचे अध्यक्ष मा. अविनाश पाटील, अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष मा. माधव बावगे, कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर हे उपस्थित होते.

विवेक जागर प्रकाशनाची दोन पुस्तके, एक अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे संपादक डॉ. नितीन शिंदे लिखित ‘वास्तुशास्त्र : एक चिंतन’ आणि दुसरे वर्धा जिल्हा प्रशिक्षण विभाग कार्यवाह डॉ. माधुरी झाडे यांचे ‘वयात येताना’, अंनिप संपादक मंडळ सदस्य डॉ. बाळू दुगडूमवार यांचा कविता संग्रह ‘अस्वस्थायन आणि चंद्रदर्शन’ (ग्रंथाली प्रकाशन) या तीन पुस्तकांचे तसेच ‘अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका’ मासिकाच्या जून २०२३ च्या अंकाचे प्रकाशन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. आ. ह. साळुंखे आणि मान्यवरांच्या हस्ते झाले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या उदात्त कार्यासाठी हा परिसर उपलब्ध करून देण्याची संधी आपल्याला मिळाली याबद्दल माननीय भोसले सरांनी समाधान व्यक्त केले. आपल्या संस्थेच्या आवारात या प्रसंगाच्या निमित्ताने डॉ. आ. ह. साळुंखे सरांची असलेली उपस्थिती ही आपल्यासाठी गौरवाची बाब आहे, अशा भावना व्यक्त करीत त्यांनी पुस्तकांच्या लेखकांना सदिच्छा दिल्या. डॉ. नितीन शिंदे यांनी आपल्या ‘वास्तुशास्त्र – एक चिंतन’ या पुस्तकाचा परिचय करून दिला. ‘वयात येतांना’ या पुस्तकाच्या लेखिका डॉ माधुरी झाडे यांच्या अनुपस्थितीत त्यांनी पाठवलेले मनोगत आणि आभार संदेश महा. अंनिसच्या महिला सहभाग विभाग कार्यवाह आरती नाईक यांनी या प्रसंगी वाचून दाखवला.




डॉ. आ. ह. साळुंखे सरांनी पुस्तकांच्या लेखकांचे अभिनंदन करीत म्हटले की, या लेखकांच्या अनेक वर्षांच्या कार्यातून आणि चिंतनातून ही पुस्तके साकार झालेली आहेत. समारंभाचे सूत्रसंचालन संपादक मंडळ सदस्य डॉ. बाळू दुगडूमवार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. मांतेश हिरेमठ यांनी करून दिला, तर राजेंद्र फेगडे यांनी आभार व्यक्त केले.

## लक्ष्यवेधी पुरस्कार वितरण समारंभ

महाराष्ट्र अंनिसचे कार्य आणि प्रचार, प्रसार लोकसहभागातून होत असतो. त्यातूनच संघटनेचा आर्थिक पाया भक्कम करणारे अंनिसचे हजारो हितचिंतक आणि क्रियाशील कार्यकर्ते आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वार्षिक अंकाच्या माध्यमातून बहुमोल आर्थिक पाठबळ देणारे आमचे देणगीदार, जाहिरातदार आणि वर्गणीदार यांचे जाळे विणले गेले आहे. या सर्वांना जोडतात आमचे राज्यभरातील शेकडो क्रियाशील कार्यकर्ते, ज्यांच्यामुळे निधी संकलनाचे उद्दिष्ट साध्य होते. अशा सर्व साथींचा गौरव अंनिप संपादक मंडळ आणि संघटनेच्या वतीने केला जातो. पन्हाळा येथे नुकत्याच पार पडलेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत निधी संकलनाचे विशेष लक्ष्य गाठलेल्या साथींचा 'लक्ष्यवेधी' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कारार्थींमध्ये व्यक्तिगत लक्ष्य गाठणारे साथी, लक्ष्य साध्य करणाऱ्या शाखा तसेच वर्गणीदारांचे शतक पूर्ण करणारे शतकवीर साथी यांचा समावेश आहे.

दि. ३ जून २०२३ रोजी बैठकीच्या दुसऱ्या सत्रात पार पडलेल्या या पुरस्कार वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांचेसह महा. अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य उपाध्यक्ष शामराव पाटील, कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ. बी. एम. हिर्डेकर, अंनिप'चे संपादक डॉ. नितीन शिंदे यांचेसह संपादक मंडळ सदस्य, उपस्थित होते. निधी संकलनात व्यक्तिगत लक्ष्य गाठणाऱ्यांमध्ये जामनेर शाखेचे प्रल्हाद बोऱ्हाडे, ठाणे शाखेचे सुधीर निंबाळकर, आरती नाईक, नितीन राऊत, अनिल दरेकर असे २६ कार्यकर्ते आहेत तर शाखा स्तरावरील संकलनात लातूर, नंदुरबार, जामनेर, वर्धा, नाशिक, मोहोळ जवळजवळ १७ शाखा आहेत. आणि शतकवीरांत ८ कार्यकर्त्यांचा समावेश आहेत. या सर्व पुरस्कारार्थींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. साळुंखे सरांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन करीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शनपर संबोधन केले.

परिवर्तन हे एक शास्त्र असून त्याचे सिद्धांत अंमलात आणणे ही एक कला आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासारखे असून प्रवाहांविरुद्ध जाणाऱ्यांनीच इतिहास घडवला असल्याचे दिसून येते. तरीही एखाद्या कुशल शल्यचिकित्सकाप्रमाणे कार्यकर्त्यांना हे काम करावे लागणार आहे. अशा शब्दात साळुंखे सरांनी मार्गदर्शन करून कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले. या समारंभाचे सूत्रसंचालन अजय भालकर व डॉ. बाळू दुगडूमवार यांनी केले.

●

## लक्ष्यवेधी पुरस्कार–२०२३

### लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार

- प्रल्हाद बोऱ्हाडे, महा.अंनिस शाखा : जामनेर, जि.जळगाव
- दिगंबर कट्यारे, महा.अंनिस शाखा :जळगाव, जि.जळगाव
- पी. एम. जाधव, महा.अंनिस शाखा : चंद्रपूर , जि.चंद्रपूर
- माधव बावगे, महा.अंनिस शाखा : लातूर, जि.लातूर
- रुकसाना मुल्ला, महा.अंनिस शाखा :लातूर, जि. लातूर
- निर्भय कोरे, महा.अंनिस शाखा : लातूर, जि.लातूर
- अनिल दरेकर, महा.अंनिस शाखा : लातूर, जि.लातूर
- निलेश कुडाळकर, महा.अंनिस शाखा:इस्लामपूर, जि. सांगली
- बी.आर.जाधव, महा.अंनिस शाखा:इस्लामपूर, जि. सांगली
- नितीन राउत, महा.अंनिस शाखा : अलिबाग, जि.रायगड

- आरती नाईक, महा.अंनिस शाखा:पनवेल, जि.रायगड
- विजय परब, महा.अंनिस शाखा : दादर, जि.मुंबई
- सुधीर निंबाळकर, महा.अंनिस शाखा : ठाणे, जि.ठाणे
- सविता शेटे, महा.अंनिस शाखा : बीड, जि.बीड
- परेश शाह, महा.अंनिस शाखा : शिंदखेडा, जि.धुळे
- हरीश पेठकर, महा.अंनिस शाखा : वर्धा, जि.वर्धा
- प्रकाश कांबळे, महा.अंनिस शाखा वर्धा, जि.वर्धा
- कीर्तीवर्धन तायडे, महा.अंनिस शाखा : नंदुरबार, जि.नंदुरबार
- वसंत वळवी, महा.अंनिस शाखा : नंदुरबार, जि. नंदुरबार
- रविंद्र पाटील, महा.अंनिस शाखा : शहादा, जि. नंदुरबार
- संतोष महाजन, महा.अंनिस शाखा : शहादा, जि. नंदुरबार
- प्रदीप केदारे, महा.अंनिस शाखा : शहादा, जि. नंदुरबार
- श्रीकांत बावीस्कर, महा.अंनिस शाखा : शहादा, जि. नंदुरबार
- संजय बारी, महा.अंनिस शाखा : आकुर्डी, जि. पुणे
- तेजस सपकाळ, महा.अंनिस शाखा : चाकण, जि. पुणे
- रामचंद्र घुले, महा.अंनिस शाखा : इस्लामपूर, जि. सांगली

---

## लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार

- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : जामनेर, जि. जळगाव
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : जळगाव, जि. जळगाव
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : ऊर्जानगर, जि. चंद्रपूर
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : मोहोळ, जि. सोलापूर
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : नाशिक शहर जि.नाशिक
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : नाशिक रोड, जि.नाशिक
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : लातूर, जि. लातूर
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : इस्लामपूर, जि. सांगली
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : अलिबाग, जि. रायगड
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : पनवेल, जि. रायगड
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : बीड, जि. बीड
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : शिंदखेडा, जि. धुळे
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : वर्धा, जि. वर्धा
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : नंदुरबार, जि. नंदुरबार
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : शहादा, जि. नंदुरबार
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : आकुर्डी, जि. पुणे
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा : चाकण, जि. पुणे

---

## लक्ष्यवेधी जिल्हा पुरस्कार

- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा जळगाव
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा लातूर

- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा सांगली
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा रायगड
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा ठाणे
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा वर्धा
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा नंदुरबार
- अध्यक्ष/कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा पुणे

### शतकवीर कार्यकर्ता पुरस्कार

- दादाजी गोपी बोरकर महा.अंनिस शाखा : उराडी, जि. गडचिरोली
- शब्बीर बापुमिया शेख महा.अंनिस शाखा : गडचिरोली, जि. गडचिरोली
- चोपराम काशीराम कांबळे महा.अंनिस शाखा : घोट, जि. गडचिरोली
- संजय शेंडे महा.अंनिस शाखा : पश्चिम नागपूर, जि. नागपूर
- देवराव कोंडेकर महा.अंनिस शाखा : ऊर्जानगर, जि. चंद्रपूर
- भाऊ पठाडे महा.अंनिस शाखा : औरंगाबाद, जि. औरंगाबाद
- कविता राठोड महा.अंनिस शाखा : वर्धा, जि. वर्धा
- गजेंद्र सुरकार महा.अंनिस शाखा : वर्धा, जि. वर्धा

## विशेष आभार

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेला** RNI **क्रमांक आणि पोस्टाचा परवाना मिळाला**

महा. अनिसचे निधी व्यवस्थापन विभागाचे सहकार्यवाह सुधीर निंबाळकर यांच्या तत्पर पाठपुराव्यामुळे अत्यंत कमी कालावधीमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेला Registrar of News paper of India यांचा RNI No./MHMR/2022/83669 हा RNI क्रमांक मिळाला तसेच अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेसाठी पोस्टाचा परवाना मिळाला आहे सदर पोस्टाचा रजि. नंबर/Postal Regd.No.SGL/144/2023-2025 यासाठी आजय भालकर आणि संजय बनसोडे यांनी प्रयत्न केले या दोघांचेही खूप खूप आभार.

## वाचक प्रतिक्रिया

- गणित म्हटलं की उगाच चक्कर आल्यासारखं वाटत! पण अंनिपमधील गणितप्रेमी ही लेखमाला वाचायला सुरुवात केल्यावर लहानपणी शाळेत कंटाळवाणा वाटत असलेला गणित विषय किती सुंदर असु शकतो, आणि गणिताची स्वतः ची अशी एक विचारधाराही असते, हे जाणवू लागलं. खरंतर गणित कुतूहलात्मक विषय आहे. गणित दैनंदिन जीवनात शाळेव्यतिरिक्त इतरही ठिकाणी नेहमी कसा उपयोगी पडतो, हे या लेखांतून कळत.

**श्रेया माधवी,** धुळे




# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत,** पालघर
९८२३२८०३२७

**चमत्कार सादरीकरण**

**आसेगाव :** पारडी तीखे येथे अंधश्रद्धा निर्मूलनावर आधारित चमत्कार सादरीकरण कार्यक्रम महा.अंनिसचे वाशिम शाखा कार्याध्यक्ष पी.एस. खंदारे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री विजय शिंदे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. रामकृष्ण कालापाड होते. अंधश्रद्धेपासून दूर राहाण्याचे व वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचे आवाहन त्यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते नारायणराव मिटकरी, स्त्रीअब्रू रक्षा सामाजिक संघटनेचे भालेराव, भारत कांबळे, गवई, माधव अंभोरे, तात्याराव अंभोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.महेश देवळे यांनी केले. ढोरखेडा, हिवरा पेन, बेलखेडा, आसेगाव पेन येथील नागरिकसुद्धा याप्रसंगी उपस्थित होते.



**कोल्हापूर :** दि.१० मे २०२३ मौजे-थावडे, ता.शाहूवाडी येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या संयुक्त विद्यमाने महा.अंनिस शाहूवाडी शाखेने चमत्कार सप्रयोग सादरीकरण व प्रबोधनात्मक व्याख्यान कार्यक्रम सादर केला. याप्रसंगी अंनिसचे सदा पाटील व सोंडोली गावचे पोलीस पाटील व अंनिस कार्यकर्ते मिलिंद पाटील उपस्थित होते. भास्कर सदाकळे यांनी चमत्कार सप्रयोग सादरीकरण व प्रबोधनात्मक मांडणी केली. यावेळी एक कमालीची आश्वस्त करणारी बाब म्हणजे तरुणाई व लहान मुले यांचा कमालीचा प्रतिसाद व प्रत्येक प्रयोगादरम्यान कुतुहलता आणि असं का? प्रश्न विचारणे हे नक्कीच आशादायी होतं.



**अभिवादन**

**निमगुळ (धुळे) :** दि.०६ मे २०२३ रोजी बजरंग व्यायाम शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याला दिलीप खिवसरा यांनी उजाळा दिला. याप्रसंगी संजय मराठे, राकेश महाजन, जितेंद्र मोरे, मुकुंदा ठाकरे, पिंटू चव्हाण, राकेश ठाकरे, नितीन कुंभार, पांडू पैलवान, ऋषिकेश महाजन, दुर्गेश कोळी, आकाश गायकवाड, उमेश महाजन आदी उपस्थित होते.

**मासिक पाळी स्वच्छता दिवस**

**निमगुळ (धुळे) :** २८ मे रोजी जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवसानिमित्त मासिक पाळीच्या काळात महिलांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे, याबद्दल दिलीप खिवसरा यांनी निमगुळ येथे जनजागृती केली. मासिक पाळी याबाबत महिलांमध्ये खुलेपणाने चर्चा होणे, ही



काळाची गरज आहे, असे खिवसरा यांनी सांगितले. यावेळी विद्या मोरे, प्रियंका मोरे, अर्चना मोरे, दिव्यानी मोरे, सविता मोरे, नंदिनी मोरे, मीना मोरे, छाया बोरसे, माधुरी मोरे, राजश्री मोरे आदी उपस्थित होत्या.

**जागतिक तंबाखू विरोधी दिन**

**नवी मुंबई :** १ मे, जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्ताने समविचारी संघटनांनी आयोजित केलेल्या जनजागरण कार्यक्रमात शाखेने सहभाग घेतला. सदर कार्यक्रम अन्वय नशामुक्ती केंद्र, वाशी व इतर संघटनांनी आयोजित केला होता. कार्यक्रमांतर्गत तंबाखूविरोधी जनजागरण करणारी पत्रके वाटण्यात आली. मा. मधुकर वारभुवन यांनी प्रेरणा गीत सादर केले. तसेच मा. लव शर्मा दिग्दर्शित पथनाट्य सादर करण्यात आले. वृषाली मगदूम व अजित मगदूम यांच्या विशेष प्रयत्नाने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महा. अंनिस नवी मुंबई जिल्ह्यातर्फे अशोक निकम यांनी सहभाग नोंदवला.



**कोराडी (नागपूर) :** दि. ३१ मे २०२३ रोजी महा.अंनिस शाखा कोराडीच्या वतीने जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शन व तंबाखू व्यसनमुक्ती शपथ



कार्यक्रम घेतला होता. कार्यक्रमाला गौरव आळणे, बबनराव गायकवाड, ताराचंद पखिड्डे, राऊत गुरुजी, काशिनाथ पटेल, मधुकर झोडापे, कमलेश लांजेवार इ. सोबतच बहुसंख्येने कामगार उपस्थित होते.

**सत्यशोधक विवाह**

**कोल्हापूर :** ०५ जून २०२३ रोजी आधार फाऊंडेशन आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या वतीने चित्रदुर्ग मठ, कोल्हापूर येथे सामूहिक सत्यशोधक विवाह पार पडला. कार्यक्रमाचे संचालन कृष्णात स्वाती यांनी केले. यावेळी दहा जोडप्यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. पैकी दोन विवाह हे आंतरजातीय होते. अंनिसचे मोहित पोवार, आकाश भास्कर, राहुल सुतार, सचिन बनसोडे यांनी नवविवाहित जोडप्यांना शुभेच्छा दिल्या.

**महा–अंनिस बैठक**

**लासूर स्टेशन (जि. औरंगाबाद) :** येथे महा. अंनिसची बैठक कार्याध्यक्ष प्रकाश सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यात चळवळीच्या गीताने सुरुवात केली. शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले. मरणोत्तर देहदान व अवयव दान करणाऱ्यांचा सत्कार करण्याचे ठरले. बैठकीत शेषराव नाना जाधव (सभापती, मार्केट कमिटी, लासूर स्टेशन) व महा. अंनिसचे १५ जण उपस्थित होते.



**वटसावित्री मंथन अभियान**

**पनवेल :** वटपौर्णिमेनिमित्त पनवेल शाखेतर्फे ऑनलाईन अभियान राबविले गेले. या व्रताची चिकित्सा व्हावी व त्यातील स्त्री–पुरुष विषमता शोधून समाजाने समतेच्या अंगाने विचार करावा, असा यामागील हेतू होता. वटपौर्णिमेच्या आठ दिवस आधीपासून व्रतासंबंधी प्रश्न विचारणारा एक व्हिडिओ रोज प्रसारित व्हायचा. त्यातील प्रश्नांवर लोकांनी आपली मतं व्यक्त करावीत, अशी

अपेक्षा होती. या प्रश्नांतून स्त्री-पुरुष विषमता, पितृसत्ता, पुनर्जन्म, छद्मविज्ञान इत्यादी मुद्द्यांवर प्रश्नांच्या माध्यमातून चर्चा घडवण्यात आली. या प्रश्नांच्या व्हिडिओचा चांगला प्रसार झाला. तसेच आलेल्या प्रतिक्रियांमधून चिकित्सक भूमिकाही वाचायला मिळाल्या. शाखेची महिला सहभाग विभाग कार्यवाह पूजा हिने नियोजन केले होते.

**शांततेसाठी अंनिसचे प्रयत्न**

**कोल्हापूर :** ६ आणि ७ जून २०२३ रोजी झालेल्या दंगलीनंतर ८ जून रोजी समविचारी संघटनांच्या मिटिंगमध्ये महा. अंनिसच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर शिवाजी पुतळ्याजवळच्या ज्या गंजी गल्लीमध्ये घरांवर दगडफेक झाली होती, त्या गल्लीत जाऊन तेथील कुटुंबीयांची भेट घेतली. 'आम्ही भारतीय लोक'च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. भारती पवार, विजय चोरमारे यांचेसोबत अकबर मोहल्ला येथील नागरिकांशी संवाद साधण्यात आला. यावेळी रामदास देसाई, संघसेन जगतकर, निशांत सुनंदा विश्वास, स्वाती कृष्णात, राहुल सुतार, धर्मराज कांबळे, कृष्णात स्वाती उपस्थित होते.



**महिला कुस्तीगीरांच्या समर्थनार्थ निवेदन**

**खोपोली :** लैंगिक शोषणानंतरही पीडित, शोषित महिला खेळाडूंना सन्मानपूर्वक जीवन जगता यावे, तसेच आरोपीला तात्काळ अटक करून न्यायालयीन प्रक्रिया त्वरित चालवून कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी महा.अंनिस खोपोली शाखेच्या वतीने करण्यात आली. तहसीलदार आयुब तांबोळी यांना सदरचे निवेदन देण्यात आले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष यशवंत गायकवाड, महेंद्र ओव्हाळ, दयानंद पोळ, कबीर गायकवाड, विशाल उशीरे आदी उपस्थित होते.



**भूतबाधा, अर्णवच्या मृत्यूचे कारण**

**इरळी (ता. कवठेमंकाळ) :** येथे भूतबाधा झाली म्हणून अर्णव या चौदा वर्षाच्या मुलाला मारहाण करण्यात आली व त्यातच त्याचा मृत्यू झाला. ही माहिती मिळताच तासगाव शाखा कार्याध्यक्ष विनायक कांबळे व राज्यकार्यवाह भास्कर सदाकळे यांनी घरी जाऊन मुलाची आई कविता लांडगे यांची भेट घेतली. अर्णवला ताप येऊन तो बडबडत असताना त्याला भूतबाधा झाली, असं समजून मांत्रिकाकडे नेण्यात आले. मांत्रिकाने 'अर्णवला त्याच्या वडिलांनी झपाटले आहे. ते काढले पाहिजे' म्हणून बाबाने काठीने मारहाण केल्यामुळे तो बेशुद्ध पडला. त्याला लगेच मिरज येथे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. पण डॉक्टरांनी अर्णवला मृत घोषित केले. मांत्रिकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समाजातील लोकांच्या डोक्यातून भूत कधी जाणार, हा भला मोठा प्रश्न आहे.

●




# गणितप्रेमी

सूरज उर्मिला सुनील

शरीराचा विकास होण्यासाठी व्यायाम महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे बौद्धिक विकास आणि एकाग्रता वाढवण्यासाठी कोडी सोडवणं उपयोगी ठरतं. एकट्याने किंवा गटाने कोडी सोडवताना एक वेगळाच आनंद मिळतो. आपण शालेय वर्षाची सुरुवात होत असताना वर्षभर अशी गणिती कोडी सोडवण्याचा संकल्प नक्कीच करू शकता!

**१) टॅनग्राम :** हे एक प्रसिद्ध कोडे आहे. यामध्ये सात भौमितिक आकारांचे तुकडे आणि विविध चित्रांचे पुस्तक असते. या तुकड्यांपासून माणूस, प्राणी, पक्षी, वस्तू, अंक, अक्षरे अशा शेकडो आकृत्या बनवायचे हे कोडे आहे. दिसताना सोपे दिसत असले, तरी खेळताना यातले काठिण्य समजते. भूमितीच्या अनेक संकल्पना स्पष्ट होतात. कल्पनाशक्ती, विश्लेषण कौशल्य, मांडणी कौशल्य यांचाही विकास होतो.



**२) २४ :** प्रवास करताना खेळायचा खेळ आहे. प्रवासात आपल्या आजूबाजूला असणाऱ्या गाड्यांची नंबरप्लेट बघायची. त्यावर चार अंक दिसतील. त्या चार अंकांमध्ये बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यापैकी कोणत्याही क्रिया वापरून २४ उत्तर आणायचं. उदा.गाडीचा नंबर : ६८४९ उत्तर:(८÷४)x ९+६=२४. अट अशी की एक अंक एकदाच वापरायचा व सर्व अंक वापरायचे. बऱ्यापैकी सर्व संख्यांपासून २४ हे उत्तर आणता येते. प्रवासात वेगवेगळ्या गाड्या नेहमीच दिसत असल्याने हा खेळ कधीच संपत नाही. या खेळात अंकात्मक तार्किक कौशल्य वापरले जाते.



**३) चेनसॉल्वर :** यामध्ये विशिष्ट आकाराच्या धातूचे तुकडे एकमेकांमध्ये अडकवलेले असतात. ताकद न लावता फक्त डोकं चालवून, विशिष्ट पद्धतीने ते तुकडे फिरवून एकमेकांपासून वेगळे करायचे असतात. त्यानंतर वेगळे केलेले तुकडे पुन्हा एकमेकांत अडकवणे, हेही ध्येय असते. या कोड्यामध्ये कल्पनाशक्ती, भूमितीय कौशल्ये, सृजनशीलता विकसित होते.

**४) सुडोकू :** यात एका चौरसाचे ९:९ छोट्या चौरसांमध्ये विभाजन झालेले आहे. प्रत्येक ओळीत आणि स्तंभात १ ते ९ पर्यंतचे अंक अशा पद्धतीने भरायचे की, कोणताही अंक एका ओळीत किंवा स्तंभात किंवा ३:३ च्या छोट्या चौरसात फक्त एकदाच येईल. आधी दिलेले अंक हलवायचे नाहीत. एकाग्रता, मांडणी कौशल्य, तर्क आणि गणितातील अनेक संकल्पना यामध्ये वापरल्या जातात. चला, तर मग सोडवूया.

**कोडे क्रमांक : ८**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ | | ४ | | | | | |
| ४ | | | | | | १ | ८ | |
| ५ | १ | ६ | | २ | | | | |
| | २ | ३ | १ | ५ | ७ | | | |
| १ | ६ | ९ | | | | | ५ | ३ |
| | | ४ | | | | २ | १ | |
| ९ | | ८ | ६ | | | | | १ |
| ६ | | १ | ५ | | ९ | ८ | | |
| | | ५ | ८ | ३ | १ | | ४ | ९ |

तुमचे उत्तर ९४२३३९५०९७ या व्हॉट्सअप क्र. पाठवा.

कोडे क्र. ७ चे उत्तर : ९−१=८

बरोबर उत्तर देणारे गणितप्रेमी :

राजाराम हायकर (राधानगरी), अरविंद रामटेके (वसई)
हेमंत बोरसे (शहादा), विलास निंबोरकर (गडचिरोली)

•

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १२

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | २ | | ■ | ३ | | ४ |
| | ■ | ■ | ■ | | ■ | ५ | | ■ | |
| | ■ | ६ | | | ■ | | ■ | ७ | ■ |
| ८ | | ■ | ■ | ■ | ९ | | | | १० |
| | ■ | ११ | | ■ | ■ | | ■ | ■ | |
| | ■ | | ■ | १२ | १३ | | | १४ | |
| १५ | | | ■ | १६ | | | ■ | | ■ |
| | ■ | ■ | १७ | | ■ | १८ | १९ | | २० |
| | ■ | २१ | ■ | | ■ | २२ | | ■ | |
| २३ | | ■ | २४ | | | ■ | ■ | ■ | |

**आडवे शब्द:**

१) भारतातील विमानसेवेचे जनक

३) १५व्या शतकातील दोहे लिहिणारे एक संत

५) हवेच्या दाबाने किंवा मोठ्या आवाजाने कानाला हे बसतात

६) चंद्रावरील किंवा अन्य ग्रह–उपग्रहावरील गोलाकार खड्डा

८) गोठलेले पाणी

९) बाबा आमटे यांच्या आश्रमाचे नाव

११) कोणतेही लिखाण ही वापरूनच करता येते

१२) पहिल्या टेस्ट ट्यूब बेबीचे नाव

१५) टेलिप्रिंटरवरून येणारा संदेश

१६) बधिरीकरणासाठी वापरला जात असणारा एक पदार्थ, पृथ्वीभोवती याचे आवरण आहे असा पूर्वी समज होता

१७) बडीशेपसारखा एक पदार्थ, एका भाजीच्या बिया

१८) ध्वनीच्या वेगापेक्षा अधिक वेग

२१) पृथ्वी

२२) नदीचा किनारा, एक जुने शस्त्र

२३) पंखाच्या साहाय्याने उडू शकणारे सजीव

२४) कपाशीचे बी

(उत्तर पुढील अंकात)

**उभे शब्द**

१) पृथ्वीपासून १५ लाख किलोमीटर दूरवर अंतराळात सोडलेली अत्याधुनिक दुर्बिण

२) गाड्यांच्या चाकावरील रबरी आवरण

३) शनीच्याभोवती हे असते

४) मौल्यवान खडे.

५) आर्य समाजाचे संस्थापक

७) जीभ या अवयवामुळे ही कळते

१०) या अवयवामुळे आपल्याला दिसते

११) संगणकात वापरली जाणारी विंडोज सारखी एक लोकप्रिय ऑपरेटिंग सिस्टिम

१२)रेबिज या श्वानदंशाने होणाऱ्या व आजारावर इंजेक्शन शोधणारा शास्त्रज्ञ

१३)अंतर्गत रक्तस्त्रावावर या गोळ्या वापरतात

१४)चार्ल्स डार्विन याने मांडलेला सिद्धान्त

१९)खाण्यासाठी, पूजेसाठी, जादूटोण्यासाठी वापरले जाणारे आत पाणी असलेले एक फळ

२०) मागील दोन पाय किंचित आखूड असलेला एक जंगली 'हसणारा' प्राणी

## विवेक–विज्ञान शब्दकोडे ११ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १अ | ल्ब | र्ट | ए | २लि | स | ■ | ३प | र | ४म |
| ब्रा | ■ | ■ | ■ | ट | ■ | ५जं | त्री | ■ | हा |
| ६ह | ७वा | ■ | ८धू | म | के | तू | ■ | ९क्षि | प्र |
| १०म | क | र | ■ | स | ■ | ■ | ११शा | र | जा |
| १२को | डे | ■ | १३आ | पे | गा | व | ■ | ■ | प |
| वू | ■ | १४वि | ■ | प | ■ | ■ | १५गो | म | ती |
| र | ■ | १६प्र | १७बी | र | घो | १८ष | ■ | ■ | गौ |
| ■ | १९रो | ■ | ज | ■ | ■ | ट् | ■ | २०शी | त |
| ■ | बो | ■ | ■ | २१क | र | को | २२चा | ■ | मी |
| २३चॅं | ट | जी | पी | टी | ■ | २४न | क | ल | ■ |

# लक्ष्यवेधी पुरस्कार वितरण समारंभ २०२३

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती व अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका यांच्या वतीने देण्यात आलेले लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार, लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार, लक्ष्यवेधी जिल्हा पुरस्कार आणि शतकवीर कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित करत असतानाची क्षणचित्रे



पी.एम.जाधव, चंद्रपूर




नितीन राऊत, अलिबाग



संजय बारी, पुणे



सविता शेटे, बीड



वर्धा जिल्हा कार्याध्यक्ष अरुण भोसले, गजेंद्र सुरकार, प्रकाश कांबळे, हरीश पेठकर व इतर कार्यकर्ते



शहादा (नंदुरबार) जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, विनायक साबळे आणि इतर कार्यकर्ते



लातूर शाखेचे कार्याध्यक्ष सुधीर भोसले, अनिल दरेकर व इतर कार्यकर्ते



जामनेर (जळगाव) जिल्हा प्रधानसचिव प्रल्हाद बोऱ्हाडे, विश्वजित चौधरी व इतर कार्यकर्ते

Registered News Paper
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd.No.SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409, Published and Posted on 5th July 2023

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष पहिले अंक दहावा, ५ जुलै २०२३ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 1 Issue 10, 5th July 2023 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

**वर्षभरात विशेषांकासह ११ मासिक अंक मिळवा घरपोच**

वर्गणीदार तसेच देणगी/ जाहिरात देऊ इच्छिणाऱ्यांनी विवेक जागर संस्थेच्या खालील अकाउंट नंबरवर रक्कम जमा करावी.

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R

- रक्कम जमा केल्यानंतर व्यवस्थापकीय संपादक अजय भालकर यांच्याशी संपर्क करणे.
- आपल्या सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. पोस्टाने अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास व्यवस्थापकीय संपादकाकडे संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामामध्ये सहभागी होण्यासाठी खालील कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा.**

| राज्य प्रधानसचिव | | | | राज्य कार्याध्यक्ष | राज्य अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| नंदकिशोर तळाशीलकर | गजेंद्र सुरकार | डॉ. टी. आर. गोराणे | संजय बनसोडे | माधव बावगे | अविनाश पाटील |
| ९८६९१७००६२ | ९४०४८९१७२२ | ९४२०८२७९२४ | ९८५०८९९७१३ | ९४०४८७०४३५ | ८९७५१३०६०९ |

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९.
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

Printed Book Post

**प्रेषक,**

अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९.
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.